सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि.१७ एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ४ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### नागपूर काँग्रेसमध्ये मतभेद

नागपूर : नागपूर महापालिकेतील स्वीकृत सदस्य निवडीवरून काँग्रेसमध्ये अंतर्गत वाद उफाळला आहे. नितिन राऊत यांनी त्यांच्या गटाला डावलल्याचा आरोप करत नाराजी व्यक्त केली आहे. शहराध्यक्ष गटालाच दोन्ही संधी दिल्याने असंतोष वाढला असून राजीनाम्याच्या चर्चांनाही उधाण आले आहे. राऊत यांनी पक्षात अन्याय होत असल्याचा आरोप करत इशारा दिला आहे.

### रात्रीतून तीन ठिकाणी चोरी

कोल्हापूर : हातकणंगले तालुक्यातील माणगाव फाटा परिसरात मंगळवारी रात्री तीन वेगवेगळ्या ठिकाणी चोरीच्या घटना घडल्याने खळबळ उडाली आहे. अज्ञात चोरट्यांनी दुकाने आणि गोडाऊन यांना लक्ष्य करत रोख रक्कम आणि साहित्य लंपास केले आहे. मात्र चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून हातकणंगले पोलिसांसमोर आव्हान निर्माण झालं आहे.

### ३३ वर्षांचा पेच सुटणार?

पुणे : पुण्यातील बाणेर–पाषाण लिंक रोड प्रकल्पाला अखेर गती मिळण्याची चिन्हे आहेत. तब्बल ३३ वर्षांपासून भूसंपादनातील २०० मीटर अडथळ्यामुळे रखडलेला हा प्रकल्प मार्गी लावण्यासाठी आज महापालिकेत महत्त्वाची बैठक होत आहे. टीडीआर व सीमांकनावर निर्णय अपेक्षित असून, त्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात होण्याची शक्यता आहे.

# विरोध करणाऱ्यांना दीर्घकाळ किंमत चुकवावी लागेल!

## महिला आरक्षणावरुन पंतप्रधान मोदींचा थेट इशारा

**वृत्तसंस्था**

**नवी दिल्ली :** महिला आरक्षणावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना धारेवर धरलं आहे.

महिला आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना याची किंमत प्रदीर्घकाळ चुकवावी लागेल, अशा शब्दांत पंतप्रधान मोदी यांनी विरोधकांना लक्ष्य केलं. महिलांच्या अधिकाऱ्यांना विरोध करणाऱ्यांना माफी मिळणार नाही, असंही मोदी यांनी लोकसभेत बोलताना सुनावलं. महिला आरक्षणावर लोकसभेत आज चर्चा होत आहे. याच विषयावर बोलताना पंतप्रधानांनी विरोधकांचा समाचार घेतला.

'कोणत्याही देशाच्या आयुष्यात असे काही निर्णायक क्षण येतात. त्यावेळी समाजाची मानसिकता आणि नेतृत्त्वाकडे असलेली त्या संधीचं सोनं करण्याची क्षमता देशाचं भविष्य बदलते. एका सशक्त देशाची निर्मिती करते. भारतीय लोकशाहीच्या इतिहासात हा क्षण तसाच आहे. भारत लोकशाहीची जन्मभूमि आहे. विकासाच्या यात्रेला एक नवा आयाम देण्याची पवित्र संधी आपल्याला मिळाली आहे. देशाच्या निम्म्या लोकसंख्येला राष्ट्र निर्माणाच्या निर्णय प्रक्रियेत सहभागी करण्याची संधी आपल्याला मिळाली, हे आपलं भाग्य आहे,' असं मोदी म्हणाले.



या महत्त्वाच्या आणि मोक्याच्या क्षणी खासदारांनी साथ द्यावी, असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. आपण सगळे भारतीय एकत्रितपणे देशाला एक नवी दिशा देत आहोत, असं मोदींनी म्हटलं. 'आपण आपल्या शासन प्रणालीत अधिक संवेदनशीलता आणण्यासाठी प्रयत्न करत आहोत. या मंथनातून जे अमृत निघेल ते केवळ देशाच्या राजकीय स्वरुपाला वेगळा आकार देणार नाही, तर देशाची दिशा ठरवेल, देशाची परिस्थिती बदलेल,' असा विश्र्वास मोदींनी व्यक्त केला.

एका राष्ट्राच्या रुपात विचार करणं ही आपली जबाबदारी आहे. काश्मीर असो वा कन्याकुमारी असो, आपण ना तुकड्यांमध्ये विचार करु शकतो, ना निर्णय घेऊ शकतो. केवळ राजकीय लाभासाठी वादळ निर्माण केलं जात आहे. हा प्रकार चुकीचा आहे, असं मोदी म्हणाले.

कोणत्याही राज्याचं महत्त्व कमी होणार नाही, याची ग्वाही मोदींनी लोकसभेत दिली. 'लोकसभेतील कोणत्याही राज्याचं महत्त्व घटणार नाही. काही जण केवळ राजकीय स्वार्थासाठी वादळ निर्माण करत आहोत,' अशा शब्दांत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा दिला. 'जर गॅरेंटी शब्द हवा असेल तर मी त्या शब्दाचा वापर करतो. जर तुम्हाला आश्र्वासन शब्द हवा असेल तर मग ती त्याचा वापर करतो. तमिळमध्ये कोणता अधिक चांगला शब्द असेल तर तो बोलायलाही मी तयार आहे. कारण नियत साफ असेल तर शब्दछल करण्याची गरज भासत नाही,' असं म्हणत मोदींनी दक्षिणेकडील राज्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला.

# विनोद तावडेंमुळे बिहारमध्ये भाजपचा पहिला मुख्यमंत्री

पाटणा :बिहारमध्ये पहिल्यांदाच भाजपचा मुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी शपथ घेतली असून त्यांच्या या यशात अनेकांचा वाटा असला तरी यात भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस, महाराष्ट्रातील नेते आणि राज्यसभा खासदार विनादे तावडे यांचा सिंहाचा वाटा असल्याचे बोलले जात आहे.

पक्षाने तावडे यांना तिकीट नाकारल्यानंतरही पक्षासाठी आणि पक्षातील इतर नेत्यांना मोठे करण्यासाठी तावडे यांनी मिशन मोडवर काम केल्याची आता राज्यात चर्चा सुरू झाली आहे. सप्टेंबर २०२२ मध्ये जेव्हाविनोद तावडेयांची बिहारचे प्रभारी म्हणून नियुक्ती झाली, तेव्हा भाजप तिथे सत्तेबाहेर होता. जानेवारी २०२४ मध्ये नितीश कुमार यांनी 'महाआघाडी' सोडून पुन्हा भाजपसोबत येण्याचा जो निर्णय घेतला, त्यामागे तावडे यांनी पडद्यामागून केलेली यशस्वी शिष्टाई अत्यंत महत्त्वाची मानली जाते. त्यांनी अत्यंत गुप्तपणे चर्चा करून भाजपसाठी सत्तेचे दरवाजे पुन्हा उघडले. २०२५ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने ८९ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष बनण्याचा मान मिळवला.विशेष म्हणजे तावडे यांनी यानिवडणुकीत सूक्ष्म नियोजनकेले होते.



प्रशांत किशोर यांच्या 'जनसुराज्य'ला रोखण्यासाठी एकीकडे प्रशांत किशोर यांच्या प्रभावावर मर्यादा आणल्या तर दुसरीकडे मतदारांचा कल विकासाच्या मुद्द्यावर वळविण्यात यश मिळवले. तावडें यांनी त्यांच्या 'अभाविप'च्या अनुभवाचा वापर करून बिहारमधील प्रत्येक बूथवर कार्यकर्त्यांचे जाळे मजबूत केले.

बिहारहे पारंपरिकरित्या जातींवर आधारित राजकारणाचे केंद्र राहिले आहे. तावडे यांनी ही प्रतिमा बदलण्यासाठी जातीच्या पलीकडे विकास ही संकल्पना मांडली आणि ती तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवली. त्यामुळेच अतिमागास आणि तरुण मतदारांनी भाजपला मोठी पसंती दिल्याचे मानले जात आहे.

नितीश कुमार यांनी राज्यसभेवर जाण्याचा निर्णय घेतल्यावर, बिहारमध्ये भाजपचा मुख्यमंत्री बसवण्यासाठी तावडे यांनी मित्रपक्षांना विश्र्वासात घेऊन सम्राट चौधरी यांच्या नावावर एकमत घडवून आणल्याचे सांगितले जाते.

यामुळेच बिहारमध्ये अनेक दशके 'छोटा भाऊ' म्हणून राहिलेल्या भाजपचा स्वतः चा मुख्यमंत्री विराजमान होत असल्याकडे लक्ष वेधले जात आहे.

## महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी निवडणुकीची घोषणा

मुंबई:महाराष्ट्र विधानपरिषदेच्या रिक्त होणाऱ्या ९ जागांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगाने निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली आहे. विधानपरिषदेच्या या ९ जागांसाठी २३ एप्रिलपासून अर्ज दाखल करता येणार असून १२ मे रोजी मतदान होणार आहे. मतदानाच्या दिवशीच सायंकाळी ५ वाजता मतमोजणी होणार आहे. उद्धव ठाकरे, शशिकांत शिंदे यांच्यासह ९ आमदारांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार असल्याने रिक्त होणाऱ्या जागांसाठी ही निवडणूक होत आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, २३ एप्रिल २०२६ पासून उमेदवारी अर्ज दाखल करता येणार असून ३० एप्रिल २०२६ ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख असणार आहे.

२ मे २०२६ रोजी अर्जांची छाननी करण्यात येणार आहे, तर ४ मे २०२६ हा उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस आहे. विधानपरिषदनिवडणुकीसाठी१२ मे २०२६ रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत मतदान होणार असून त्याच दिवशी सायंकाळी ५ वाजता मतमोजणीला प्रारंभ होईल.




## इंडिया स्किल्स नॅशनल स्पर्धामध्ये चमकदार कामगिरी

छत्रपती संभाजीनगर :टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज इंडिया स्किल्स नॅशनल स्पर्धा 2026 मधील आपल्या गटातील विजेत्यांची घोषणा केली.हा विजय कौशल्य उत्कृष्टता आणि युवक सक्षमीकरणासाठीच्या त्यांच्या सातत्यपूर्ण बांधिलकीतील एक महत्त्वाचा टप्पा आहे. राष्ट्रीय स्तरावर सात कौशल्य प्रकारांमध्ये टीकेएम च्या सहभागींनी एकूण 5 सुवर्ण, 3 रौप्य आणि 1 कांस्य अशी 9 पदके मिळवली.भारतामधील व्यावसायिक कौशल्यासाठीचे अग्रगण्य व्यासपीठ असलेल्या इंडिया स्किल्स 2025-26 स्पर्धेत देशभरातील उत्कृष्ट प्रतिभांचा सहभाग होता. ही स्पर्धा जिल्हा, विभागीय, राज्य आणि प्रादेशिक स्तरांमधून पुढे जात राष्ट्रीय स्तरावर पार पडली. या सर्व टप्प्यांमध्ये टीकेएम च्या सातत्यपूर्ण कामगिरीतून त्यांच्या कौशल्य विकासासाठीच्या संरचित दृष्टिकोनाचे आणि जागतिक मानकांनुसार भविष्यासाठी सज्ज मनुष्यबळ तयार करण्याच्या लक्षाचे प्रतिबिंब दिसून येते.

## बीपीसीएल फाउंडेशनने शिर्डीत सौरऊर्जा प्रकल्प सुरू केला

मुंबई : भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड (बीपीसीएल), ही फॉर्च्युन ग्लोबल 500 यादीतील कंपनी आणि महारत्न सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम, आपल्या सीएसआर विभाग बीपीसीएल फाउंडेशनच्या माध्यमातून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट (SSST), शिर्डी यांच्यासोबत भागीदारी करून, श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट च्या इमारतींवर 1.7 मेगावॅट क्षमतेची ग्रिड-जोडलेली रूफटॉप सौर पीव्ही वीज निर्मिती प्रणाली उभारण्याचे काम हाती घेतले आहे. यामुळे शाश्वत ऊर्जा आणि समुदाय विकासाबाबतची त्यांची बांधिलकी अधिक दृढ झाली आहे.

## मार्च २०२६ पासून ४.४० लाख जोडण्यांचे काम पूर्ण

छत्रपती संभाजीनगर :देशभरातील इंधनाची वाढती मागणी लक्षात घेता शासनाने पाइपलाईनद्वारे मिळणाऱ्या नैसर्गिक वायूच्या विस्तारासाठी एक सुनियोजित आणि कार्यक्षमता वाढवणारी मोहीम हाती घेतली आहे. स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे आणि पारंपरिक इंधनांवरील निर्भरता कमी व्हावी या उद्देशाने या धोरणात्मक आराखड्याची अंमलबजावणी केली जात असल्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने स्पष्ट केले आहे.सुनियोजित कामाचा भाग म्हणून, मार्च २०२६ पासून आतापर्यंत सुमारे ४.४० लाख पीएनजी गॅस जोडण्याचे काम पूर्ण झाले आहे. या कालावधीमध्ये आणखी ४.८८ लाख ग्राहकांनी नवीन पीएनजी जोडणीसाठी नोंदणी केली आहे. शासन मान्यताप्राप्त धोरणांमुळे या इंधनाचा वापर व स्वीकार करण्याकडे जनतेचा कल वाढला असल्याचे चित्र दिसून येत आहे.

## पशुधन विकास प्रकल्पाची सुरुवात

बीड : दीपक फर्टिलायझर्स अँड पेट्रोकेमिकल्स कॉर्पोरेशन लिमिटेड ची १००% उपकंपनी असलेल्या महाधन अॅग्रीटेक लिमिटेडने आपल्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारी (उपक्रमांतर्गत मराठवाडा विभागातील बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यात "महाधन पशुधन विकास प्रकल्प" सुरू केला आहे. हा प्रकल्प बीएआयएफ लाईव्हलीहूड अँड डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट यांच्या मार्फत राबविण्यात येत आहे. या उपक्रमाची संकल्पना आणि अंमलबजावणी श्री एस. सी. मेहता, चेअरमन आणि मॅनेजिंग डायरेक्टर, डीएफपीसीएल आणि श्रीमती पारुल मेहता, मॅनेजिंग ट्रस्टी,आयसफॉन यांच्या दूरदृष्टी आणि मार्गदर्शनाखाली साकारली आहे.

## ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत भारतीय लष्कराने सिक्कीममधील पर्यटकांची सुटका केली

पुणे : भारतीय लष्कराने, बॉर्डर रोड्स ऑर्गनायझेशन (बीआरओ) आणि स्थानिक प्रशासनाच्या सहकार्याने, ऑपरेशन हिमसेतू अंतर्गत उत्तर सिक्कीममध्ये अडकलेल्या पर्यटकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. तारामचूच्या पुढे भूस्खलनामुळे रस्त्याचा एक महत्त्वाचा भाग कोसळल्याने, चट्टनकडे जाणारा मार्ग बंद झाला आणि शेकडो पर्यटक अडकून पडले. त्यानंतर हे ऑपरेशन सुरू करण्यात आले. भारतीय लष्कराचे अभियंते—त्रिशक्ती सॅपर्स—तात्काळ कामाला लागले आणि त्यांनी रस्त्याची दुरुस्ती सुरू केली. या ऑपरेशनमधील एक महत्त्वाचे यश म्हणजे तुटलेल्या रस्त्यावर एका तात्पुरत्या पादचारी पुलाचे वेगाने बांधकाम करणे, ज्यामुळे कठीण हवामान आणि भूभाग असूनही लोकांना सुरक्षितपणे बाहेर पडणे शक्य झाले. याव्यतिरिक्त, पथकांनी डोंक्याला पास येथील दाट बर्फ देखील हटवला, ज्यामुळे मार्ग खुला राहिला आणि बचावकार्य सुरू राहिले.

## द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' अहवालात जेन अल्फा ग्राहक प्रवृत्तीवर प्रकाश टाकला

पुणे - जेन अल्फा ही डिजिटलदृष्ट्या खोलवर जोडलेली पिढी आहे, जी भारताच्या लोकसंख्येच्या चतुर्थांशाहून अधिक भागाचे प्रतिनिधित्व करते. या पिढीतील 73% मुलांकडे आधीच वैयक्तिक स्मार्टफोनची उपलब्धता आहे आणि 60% मुले लॅपटॉपचा वापर करतात. ही अशी पिढी आहे ज्यांनी तंत्रज्ञानामध्ये स्वातंत्र्याचा अनुभव घेतला आहे. जेनरेशन अल्फाला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यासाठी, रुकम कॅपिटलने 'जेन अल्फा डिकोडेड: द कंझ्युमर-ब्रँड डायनॅमिक' हा अनोखा अहवाल सादर केला आहे, जो ते ग्राहक वर्तन आणि ब्रँड एंगेजमेंट कसे नव्याने परिभाषित करत आहेत हे स्पष्ट करतो.

## ऑनलाइन एलपीजी बुकिंगमध्ये ९८% वाढ

छत्रपती संभाजीनगर - एलपीजी उपलब्धतेबाबत ग्राहकांमध्ये विश्वास आणि सकारात्मक बदल दिसून येत आहेत . शासनाने केलेली कडक कारवाई, नियमित पुरवठा आणि पारदर्शक उपायांमुळे विनाअडथळा गॅस मिळण्याची खात्रीही ग्राहकांना पटली आहे. यामुळे ग्राहक अधिक जागरूक झाले आहेत. परिणामी अतिरिक्त साठा कमी झाला असून डिजिटल माध्यमांचा वापर वाढला आहे. देशव्यापी मोहिमेचा भाग म्हणून, मार्च २०२६ पासून १.२८ लाखांहून अधिक तपासण्या आणि छापे टाकण्यात आले आहेत. या कारवाईमध्ये ५९,००० हून अधिक एलपीजी सिलेंडर जप्त करण्यात आले. साठा करून ठेवणे, काळाबाजार रोखणे, घरगुती गॅसचा गैरवापर थांबवणे आणि वितरण व्यवस्थेत पारदर्शकता आणणे हा या कारवाईमागील मुख्य उद्देश आहे.

## विवोने विवो टी5 प्रो सादर केला

पुणे - विवो इंडियाने आज त्यांच्या कार्यक्षमतेवर आधारित सिरीज टी सेगमेंटमधील नवीन स्मार्टफोन, विवो टी5प्रो सादर केला. हा स्मार्टफोन अशा वापरकर्त्यांसाठी डिझाइन केला आहे जे पॉवर, बॅटरी टिकण्याची क्षमता आणि अखंड कार्यक्षमतेला प्राधान्य देतात. टी5 प्रो मध्ये विवोची आतापर्यंतची सर्वात मोठी 9020 एमएएच बॅटरी आहे, तो 0.825cm च्या अतिशय स्लिम बॉडीमध्ये येतो आणि नेक्स्ट-जनरेशन प्रोसेसिंग व एक सुधारित डिझाइन अनुभव देतो. स्नॅपड्रॅगन 7एस जेन 4 प्रोसेसर, 144हर्ट्झ रिफ्रेश रेट असलेला 1.5के अमोलेड डिस्प्ले आणि सेगमेंटमधील सर्वात मोठी 7000 स्क्वेअर मिलीमीटर व्हीसी कूलिंग सिस्टीमने सुसज्ज असलेला विवो टी५ प्रो, अत्यंत सुरळीत गेमिंगसाठी डिझाइन केला आहे, जो दीर्घकाळ टिकणारी उत्कृष्ट कामगिरी आणि प्रभावी उष्णता व्यवस्थापन प्रदान करतो

## 'भागूबाई'चा धमाकेदार ट्रेलर प्रदर्शित

मुंबई: मराठी चित्रपटसृष्टीतील प्रेक्षकांची लाडकी अभिनेत्री

# आयएसटीडी व हेडगेवार हॉस्पिटलची संस्मरणीय कार्यशाळा



**छत्रपती संभाजीनगर |** कार्यशाळेच्या सुरुवातीला रोपांना पाणी घातल्या नंतर वंदे मातरम् गीत सामुदायिक रीत्या गायले गेले. नंतर भारतीय संविधानाचे सामूहिक वाचनानी कार्यशाळेची सुरुवात झाली. ISTD छत्रपति संभाजी नगरच्या चाप्टरचे सुनील कस्तुरे यांनी ISTD या संस्थेची माहिती दिली. हेडगेवार रुग्णालयाचे एचआरहेड रविंद्र कोलारकर यांनी रुग्णालया विषयी देताना सांगितले.. छत्रपती संभाजी नगरच्या भाग्यनगर येथे 1989 साली हेडगेवार हॉस्पिटल ची सुरुवात झाली 2000 साली ते मोठ्या जागेमध्ये स्थलांतरित करण्यात आले. आज या विस्तार झालेल्या हेडगेवार हॉस्पिटलमध्ये सहाशेहून अधिक कॉडची व्यवस्था करण्यात आलेली आहे.प्रा.जयप्रकाश बागडे अध्यक्ष ISTD chatrapati Sambhaji Nagar chapter यांनीHRDCON 2026 चे प्रास्ताविक केले.सागर फटाले यांनीकार्यक्रमाच्या यशस्वीते साठी शुभेच्छा दिल्या.ISTD चे माजी अध्यक्ष योगेश उपाध्याय यांनी त्यांच्या शुभेच्छा संदेश video द्वारे पाठवला त्याचे प्रसारण कार्यक्रमात करण्यात आले.

*!! संभाजी नगरच्या आय एस टी डी चाप्टरला राष्ट्रीय पुरस्काराने गौरवण्यात आले. !!*

इंडियन सोसायटी फॉर ट्रेनिंग अँड डेव्हलपमेंट छत्रपती संभाजीनगर चाप्टर यांना राष्ट्रीय स्तरावर प्रशिक्षण व विकास या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल स्मॉल बेस्ट चाप्टर अवॉर्ड 2025 26 या वर्षाकरिता देऊन गौरवण्यात आले आयएसडी नवी दिल्ली यांच्यातर्फे हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आलेला आहे.

कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ प्रा.रंजन गर्गे यांनी भारतीय ज्ञान परंपरा ही विश्व कल्याणाची गंगोत्री आहे हे सांगितले.अध्यात्म व विज्ञान यांची सांगड घालण्याची गरज आहे असेही त्यांनी सांगितले. भगवतगितेत विश्व कल्याणाच्या खूप गोष्टी सांगितल्या आहेत. भारतीय शास्त्रज्ञांनी विश्वाच्या सुरुवातीला खूप चांगले शोध लावले होते हे छान शब्दांमधून त्यांनी सांगितले.नंतर टीब्रेकमधे चहा ऐवजी एनर्जी ड्रिंक देण्यात आले.दालचिनी सुंठ मिरे याचा गरम गरम वाफाळता आरोग्य दायी काढा सर्वांना दिलागेला.या सर्व गोष्टी कार्यशाळेचे वेगळेपण जाणवून देत होत्या.कोणालाही कंटाळा येऊ नये त्यादृष्टीने प्रा. जयप्रकाश बागडे काळजी घेत होते.

नंतरच्या सत्रात प्रदूषणातून प्रसन्नतेकडे याविषयावर मार्गदर्शन करताना डॉ.रंजन गर्गे म्हणाले सध्या आपण करत असलेली पाण्याची नासाडी, वृक्षतोड, ई कचरा, प्रदूषण, इंधन ऊर्जा स्त्रोतांचा अती व गैरवापर, यातून निर्माण होणारे भविष्याचे विदारक भीषण चित्र डोळ्यासमोर उभे केले, लक्ष त्याचा अटकाव करण्यासाठी आज आपल्या जीवनशैलीत बदल करून उद्याचा प्रसन्न दिवस कसा निर्माण करू शकतो हे विविध प्रकारच्या उदाहरणातून सांगितले.

कार्यक्रमात महिला अधिक संख्येने दिसत होत्या.नंतरच्या सत्रात रविंद्र कस्तुरे यांनी निमंत्रित महिलांनाव्यासपीठावर बोलावून त्यांच्या परिचय करून देण्यात आला.सर्व गृहिणींनी आपापले उद्योग सुरू केले होते आणि प्रश्नोत्तर द्वारे त्यांनी आपला प्रवास सर्वांना उलगडून सांगितला.नोकरीत दैनंदिन काम करत असताना आपल्यावर नवीन जबाबदारी आली की नको वाटते आणि या महिलांनी उद्योग व्यवसायाचा अनुभव नसतानाही किती जोखीम घेऊन मेहनतीने घर आणि कामाचा समतोल राखत आपल्या व्यवसायात यशस्वी झाल्या. हे ऐकून खूप प्रेरणा मिळाली.सर्वांनीच आपल्या यशाचे श्रेय स्वतःकडे राखून न ठेवता आपले जोडीदार पाठीशी होते त्यामुळे शक्य झाले हे आवर्जून सांगितले. कार्यशाळेत आलेल्या या नवउद्योजिका महिलांचा स्मृतीचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.त्यामधे

सुप्रिया कुलकर्णी , अनुपमा देवळाणकर , सुनीता साकला ,प्रतिभा गुरनाळे ,जया ननावरे , हेमलता तांबे , वैशाली जाजू , मनिषा गाडे , सोनाली सराफ ,सिमा पाटील त्यानंतर भारती खरटमल यांनी सुंदर मार्गदर्शन केले. कार्यशाळेच्या पहिल्या दिवसाची सांगता राष्ट्रगीताने झाली आणि सर्वांना सात्विक जेवणाची व्यवस्था केलेली होती.

कार्यशाळेचा दुसरा दिवस

दुसऱ्या दिवशी सकाळी ८ वाजता आल्यानंतर स्वादिष्ट नाष्टा व फलाहार देण्यात आला. चहा कॉफी ऐवजी आरोग्यदायी काढा देण्यात आला. कार्यशाळेचे वेगळेपण मनाला सुखावून गेले.

सकाळी प्रसन्न वातावरणात काल झालेल्या विषयांवर प्रा. जयप्रकाश बागडे सरांनी सर्वांना पुन्हा एकदा प्रश्न उत्तराच्या द्वारे पुनरावलोकन करून दिले. तसेच work-life balance, HRD, Excellence in lifestyleआनंदी जीवनाचे ११ सूत्रे सांगितली. कार्यशाळेच्या दुसऱ्या दिवसाला सुरुवात रोपांना उपस्थित सर्व participants च्या हस्ते पाणी देऊन करण्यात आली. वंदे मातरम्, प्रार्थना व संविधानाचे सामूहिक वाचन करण्यात आले.

## क्रांती चौकात रंगली चार्ली चॅपलिन यांची १३७ वी जयंती; ज्युनिअर चार्ली फाउंडेशनचा अनोखा उपक्रम

### वाहतुकिचे नियम तोडणाऱ्यांना चार्ली चाप्पिन यांनी गुलाब पुष्प देत क्रांती चौकात वाहनधारकांची जनजागृती केली

**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.१६ एप्रिल : जागतिक रंगभूमी आणि चित्रपटसृष्टीचे महानायक सर चार्ली स्पेंसर चॅपलिन यांची १३७ वी जयंती आज शहराच्या मध्यवर्ती ठिकाण असलेल्या क्रांती चौक येथे उत्साहात साजरी करण्यात आली. 'ज्युनिअर चार्ली फाउंडेशन'च्या वतीने या विशेष सोहळ्याचे आयोजन ज्युनिअर चार्ली च्या वेशभूषेत सोमनाथ स्वभावणे,व सुमित पंडित यांच्या वतीने करण्यात आले होते.



कलात्मक आदरांजली

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते चार्ली चॅपलिन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.यावेळी फाउंडेशनच्या वतीने कलाकारांनी चॅप्लिन यांच्या अजरामर मुद्रा आणि त्यांच्या सिग्नेचर स्टाईलचे सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली.केवळ मनोरंजनच नव्हे, तर चॅपलिन यांच्या जीवनप्रवासातून मिळणारा संघर्षाचा आणि आनंदाचा संदेश या निमित्ताने नागरिकांपर्यंत पोहोचवण्यात आला.सामाजिक बांधिलकीचा वारसा ज्युनिअर चार्ली फाउंडेशन ही संस्था गेल्या अनेक वर्षांपासून कला आणि सामाजिक कार्याची सांगड घालत आहे. जयंतीच्या या औचित्याने संस्थेच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांची माहिती देण्यात आली."चार्ली चॅपलिन यांनी हसवता हसवता जगाला जगण्याचे तत्वज्ञान शिकवले,तोच वारसा पुढे नेण्याचा चार्ली फाउंडेशन चा प्रयत्न आहे," अशी भावना यावेळी आयोजकांनी व्यक्त केली.या सोहळ्याला शहरातील नागरिक, कलाकार आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावून कलाकारांना प्रोत्साहन दिले.क्रांती चौक परिसर काही काळासाठी चॅपलिन यांच्या आठवणींनी आणि हास्याने उजळून निघाला होता.स्वतःचे दुःख मनात ठेवूनही इतरांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवणाऱ्या चार्ली चॅप्लिन यांच्या शैलीतून मुख अभिनय करत 'ज्युनिअर चार्ली'ने उपस्थितांचे मन जिंकले.या कार्यक्रमाला उत्तरेश्वर मुंडे पोलीस उपनिरीक्षक वाहतूक शाखा,संस्थापक अध्यक्ष सोमनाथ स्वभावणे,उपाध्यक्ष सुमित पंडित,कार्तीक वाघ, वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी राहुल मस्के,अमोल ढवळे,तबसूम पठाण यांच्यासह वाहतूक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत नागरिकांना नियम पाळण्याचे आवाहन केले.

### नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळावे सुरक्षित प्रवास करावा

छत्रपती संभाजीनगर शहरातील क्रांती चौक येथे 'ज्युनिअर चार्ली'च्या वतीने आगळावेगळा उपक्रम राबवण्यात आला.चार्लीच्या वेशभूषेत सुमित पंडित आणि सोमनाथ स्वभावने यांनी वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांसह नागरिकांमध्ये रस्ते वाहतूक सुरक्षा नियमांची जनजागृती केली.नियम तोडणाऱ्या नागरिकांना दंडाऐवजी गुलाबाची फुले देत वाहतूक नियमांचे महत्त्व पटवून देण्यात आली.

- उत्तरेश्वर मुंडे

पोलीस उपनिरीक्षक वाहतूक शाखा,

## छत्रपती संभाजीनगरात रविवारी भगवान श्री परशुराम जन्मोत्सव सोहळा

### भव्य शोभायात्रा, वाहन रॅली आणि स्तंभपूजनाचे आयोजन; ३५ संघटनांचा सहभाग

छत्रपती संभाजीनगर: ब्राह्मण समाज समन्वय समितीच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही भगवान श्री परशुराम जन्मोत्सव रविवार, दि. १९ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. यानिमित्त शहरात भव्य शोभायात्रा, दुचाकी रॅली आणि विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष मिलिंद दामोदरे व प्रकल्प प्रमुख भीमराव कुलकर्णी यांनी दिली.



कार्यक्रमाची रूपरेषा:

जन्मोत्सवाच्या पूर्वसंध्येला, शनिवारी सायंकाळी ६ वाजता क्रांती चौक येथे 'वेद शांती पाठ' संपन्न होईल. मुख्य सोहळ्याची सुरुवात रविवारी सकाळी ८:३० वाजता औरंगपुरा येथून भव्य दुचाकी रॅलीने होईल. परशुराम आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष कॅ. आशिष दामले यांच्या हस्ते रॅलीचा शुभारंभ व स्तंभपूजन करण्यात येईल. सकाळी १० वाजता समर्थ राममंदिर येथे विप्र फाउंडेशनतर्फे प्रतिमा पूजन व रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे.

भव्य शोभायात्रा:

सायंकाळी ५ वाजता समर्थ राममंदिर येथून मुख्य शोभायात्रेला प्रारंभ होईल. प.पू. माई महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत निघणारी ही यात्रा सावरकर चौक, निराला बाजार मार्गे औरंगपुरा येथील परशुराम स्तंभाजवळ विसर्जित होईल. या यात्रेत चार ढोल पथके आणि सजीव देखावे आकर्षणाचे केंद्र असतील.

अखिल भारतीय ब्राह्मण महासंघासह ३५ संघटना या नियोजनात सक्रिय असून, भाविकांसाठी ठिकठिकाणी पाणी व शीतपेयांची सोय करण्यात आली आहे. उत्सवाच्या यशस्वीतेसाठी दत्तात्रय पिंपळे, प्रवीण जोशी, मंगेश पळसकर, धनंजय पांडे यांच्यासह समन्वय समितीचे पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

## अक्षय तृतीया सोहळ्याचे मुख्य आकर्षण राजस्थान धरतीवर 108 कुंडी यज्ञा मंडप

### श्री क्षेत्र वेरूळ अक्षय तृतीया निमित्त वार्षिक ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळ्याचे जय बाबाजी भक्त परिवाराकडून आयोजन

खुलताबाद दि १६ एप्रिल अक्षय तृतीया निमित्त आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक "ॐ जगद्गुरू जनशांती धर्म सोहळ्या जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने" यंदाही लाखो भाविकां च्या उपस्थितीत. दिनांक १८ एप्रिल ते २५ एप्रिल २०२६ या पर्वकाळात हा सोहळा विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांनी साजरा केला जाणार आहे (सर्वप्रथम जगद्गुरु जनार्दन स्वामी यांनी वेरूळ या ठिकाणी आपल्या अवतार कार्यात यज्ञ परंपरेचा शुभारंभ अक्षय तृतीया पर्व काळावर केला असून त्या दृष्टीने जय बाबाजी भक्त परिवारासाठी हा सोहळा विशेष आहे



हा भव्य दिव्य सोहळा जगद्गुरु स्वामी शांतिगिरी जी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शन व उपस्थितीत संपन्न होणार असल्याची माहिती जय बाबाजी भक्त परिवाराच्यावतीने प्रसिद्धीप्रमुख राजेंद्र जी पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन दिली या सोबतच

या सोहळ्यात जपयज्ञ, महिलाजप, अखंड नंदादीप तसेच १०८ कुंडात्मक यज्ञ यासाठी भव्य दिव्य मंडप .यांसारख्या उपक्रमांचे

कार्यक्रमादरम्यान जय बाबाजी भक्त परिवाराच्या वतीने विविध धार्मिक विधींचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबत सविस्तर माहिती विवेकानंद महाराज यांनी दिली

या धर्म सोहळ्यासाठी परिसरात विशेष व्यवस्था करण्यात आली असून भाविकांसाठी प्रसाद व निवासाचीही सोय करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी जय बाबाजी भक्त परिवार परिश्रम घेत आहेत.

एकूणच, अक्षय तृतीया निमित्त आयोजित हा धर्म सोहळा भक्ती, श्रद्धा आणि सामाजिक एकात्मतेचे प्रतीक म्हणून या ठिकाणी मुख्य प्रवेशाच्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजां पुतळ्याची मांडणी प्रवेशद्वारासमोर केली आहे याचबरोबर भगवान शंकराची २१ फूट उंच मूर्ती भारतातील सर्वात मोठी जगद्गुरु जनार्दन स्वामी महाराजांची २१ फूट उंचीची मूर्ती आणि परमपूज्य बाबाजींची विशेष श्रद्धा ज्या भगवान पांडुरंगावर होती त्यांची पंधरा फूट उंचीची मूर्ती या सोहळ्या दरम्यान भाविकांना दर्शनासाठी कार्यक्रमा निमित्त स्थापित होणार आहे तरी या सोहळ्याला उपस्थित राहून परमपूज्य बाबाजींचा आशीर्वाद प्राप्त करून घ्यावा असे आव्हान जय बाबाजी भक्त परिवाराचे वतीने राजेंद्र पवार यांनी केले आहे

## गलवाडा (अ) येथे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी



**तभा.वृत्तसेवा**

सोयगाव,दि.१६ एप्रिल : सोयगाव तालुक्यातील गलवाडा (अ) येथे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार,महामानव भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी गलवाडा (अ) येथील ग्रामपंचायत सदस्या सुशीलाबाई इंगळे यांच्या हस्ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.यावेळी विविध मान्यवर उपस्थितीत होते. यानंतर सायंकाळी सहा वाजता शिवाजीनगर (प्लॉट) येथून मिरवणुकीला सुरुवात झाली.'जय भीम'च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.नाचत-गात,फटाक्यांच्या आतिषबाजीत गावात मिरवणूक काढण्यात आली.रात्री उशिरापर्यंत कार्यक्रम उत्साहात पार पडला. जयंती सोहळा शांततेत पार पडण्यासाठी पोलीसांचा कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

या वेळी गावातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.कार्यक्रमात भारत तायडे,जितेंद्र सोनवणे,भारत सोनवणे,किरण इंगळे,रणवीर इंगळे,विश्वजित सोनवणे, पुंडलिक तायडे,अक्षय औरंगे,गोपाल इंगळे,नामदेव जाधव, जीवन पाटील,प्रभाकर इंगळे,मिलिंद सोनवणे,संतोष सोनवणे,ज्ञानेश्वर सोनवणे,राहुल इंगळे,सुशीलाताई इंगळे, मायाबाई जगताप,अनिता सोनवणे,शोभाबाई मगरे, रेखाबाई सोनवणे,अनु सोनवणे आदी उपस्थित होते.

## गंगा माई की बेटियाँ या मालिकेत सध्या अतिशय भावनिक वळण

छत्रपती संभाजीनगर -झी टीव्हीवरील गंगा माई की बेटियाँ या मालिकेत सध्या अतिशय भावनिक वळण पाहायला मिळत आहे. दुर्गावतीच्या दबावामुळे गंगा माई स्नेहाला सिद्धूपासून दूर होण्यास सांगते, ज्यामुळे स्नेहा पूर्णपणे कोलमडून गेली आहे. या ट्रॅकबद्दल बोलताना अभिनेत्री अमनदीप सिधू म्हणाली की, हे दृश्य चित्रित करणे तिच्यासाठी भावनिकदृष्ट्या खूप कठीण आणि वैयक्तिक अनुभवासारखे होते. स्नेहाने नुकतेच प्रेम स्वीकारले असताना तिला नात्याचा त्याग करण्यास सांगणे खूप वेदनादायी आहे. आता सिद्धू आणि स्नेहा कुटुंबाच्या दबावापुढे झुकणार की एकत्र उभे राहणार, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

पहा 'गंगा माई की बेटियाँ' या मालिकेतील हे सगळे नाट्य दररोज रात्री 9 वाजता फक्त झी टीव्हीवर!

## डॉ. देव यांनी डॉक्टर पदाचा त्याग केला

सोनी सबची नुकतीच सुरू झालेली मालिका यादें प्रेक्षकांच्या मनाला भिडत आहे डॉ. देव मेहता (इकबाल खान) यांच्या भावनिक प्रवासातून प्रायश्चित्त, जिद्द आणि स्वतःला पुन्हा शोधण्याच्या कहाणीमधून. एकेकाळी प्रसिद्ध असलेला डॉक्टर, आठ वर्षांची स्मृती हरवल्यानंतर आता स्वतःची ओळख आणि उद्दिष्ट पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. या प्रवासात त्याला तुटलेल्या नात्यांचा वेदनादायक सत्य, मुलाचा मृत्यू आणि स्वतःचा हरवलेला चेहरा सामोरा येतो जो त्यालाही ओळखता येत नाही.

**अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर**

**ई निविदा सूचना क्र:01 सन 2026-27**

**निविदा आय.डी. क्र.ANMC_2026_ANMC_1295158_1**

अहिल्यानगर महानगरपालिका बुरुडगाव कचरा येथे Design, supply, installation and commissioning of green waste 10 TPD processing unit to Biomass briquettes (Briquetting Plant-90mm) खाजगी संस्थेची नियुक्ती करणेकामी ई-निविदा मागविण्यात येत

**हदगाव नगरपरिषद हदगाव ता. हदगाव जि. नांदेड**

Email id-cohadgasilcomस्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र./बा.वि./257/2026 दिनांक 16/04/2026

**ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना**

**(नागरी दलीत्तेत्तर सुधार वस्ती योजना )**

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिद्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अनु क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदारा वा वर्ग | कामाचा कालावधी | ई-निविद फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | नगर परिषद हदगाव येथील सुभद्रा नगर अंतर्गत नांदेड रोड ते कस्तूरी मंगल कार्यालयापर्यंत सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 99,99,680 | | | | | |
| 2. | नगर परिषद हदगाव येथील आझाद चौक ते भंगी गल्ली पर्यन्त सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 9,96,400/- | 11995 3/- | करार करते वेळी 1% बिलातून 8% | वर्ग 4 व त्यावरील | 180 दिवस | 15000/- |
| 3. | नगर परिषद हदगाव येथील कमलाई नगर अंतर्गत धोंडे यांचे घर ते शेवडकर यांच्या घरापर्यंत सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 9,99,200/- | | | | | |

**जाहीर प्रसिध्दीकरण**

.ए.नं. २२६/२०२५ नि. नं. 93

**सोलापूर येथील मे. कौटूंबिक प्रमुख न्यायालय सो. यांचे कोर्टात :**

अर्जदार : श्री. प्रमोद मुरलीधराव कविश्वर

// विरुध्द //

सामनेवाली : सौ. विद्या प्रमोद कविश्वर वय : ४१ वर्षे, धंदा : घरकाम रा. फ्लॅट नं. ५, दिशा नभांगण सोसायटी बिल्डींग नं.सी, फेज-२, यशोदिप सुपर-शॉपच्या वर सत तुकोबा नगर, सिडको औरंगाबाद

ज्याअर्थी अर्जदार यांनी सामनेवाली यांचे विरुध्द घटस्फोट मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेले असून याकामी यातील सामनेवाली हिस सदर अर्जात नमुद पत्यावर नोटीस/समन्सची बजावणी पाठविले असता "सामनेवाली सध्या तिथे राहात नाही" असा रिपोर्ट आलेला आहे. तरी यातील सामनेवाली ही वर नमुद पत्यावरच रहावयास आहे.

तरी यातील सामनेवाली हिस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर अर्जाचेकामी आपले कैफियत/म्हणणे असल्यास आपण स्वतः किंवा आपल्या वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांचे आंत किंवा नेमलेली ता. १३ / ०५/२०२६ रोजी हजर रहावे, तसे न झाल्यास सामनेवाली यांचे विरुध्द एकतर्फी निकाल देण्यात येईल. याची सामनेवाली यांनी नोंद घ्यावी.

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ममदापूर येथेआज छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** महसूल विभागामार्फत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज सकाळी १० वाजता मौजे ममदापूर येथील दक्षिण मुखी हनुमान मंदिर मंगल कार्यालय, ममदापूर पाटी या ठिकाणी समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. तरी या शिबिरला जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले आहे.

या समाधान शिबिरामध्ये विविध शासकीय विभागांचे स्टॉल्स उभारले जाणार असून त्या माध्यमातून शेतकरी व नागरिकांना विविध सेवा व सुविधा एकाच ठिकाणी पुरविल्या जातील. यामध्ये प्रामुख्याने पंचायत समितीमार्फत घरकुल, जनावरांसाठी गोठा व विहीर योजनांची माहिती दिली जाईल. कृषी विभागाद्वारे ग्रीस्टॅक, फार्मर आयडी, पी.एम. विकास योजना, बी-बियाणे व खतांबाबत मार्गदर्शन केले जाईल. भूमी अभिलेख विभागामार्फत 'क' पत्रक, नकाशे व जमीन मोजणी अर्जांचे वाटप होईल, तर आरोग्य विभागाकडून नागरिकांची आरोग्य तपासणी करून आयुष्यमान कार्डांचे वितरण केले जाईल.



# विविध वृत्त...

## जि. प.वर स्वीकृत सदस्यांची निवड कधी?

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** जिल्हा परिषदेवर स्वीकृत सदस्य निवडीची घोषणा राज्य सरकारने केली. मात्र, अजून निवडीचा कार्यक्रम न लागल्याने इच्छुकांत अस्वस्थता पसरली आहे. अनेक इच्छुक आपल्या बड्या नेत्यांकडे फिल्डिंग लावून बसले आहेत. राज्य सरकारने अजून अध्यादेश न काढल्याने जिल्हा परिषद पातळीवर सध्या शांतता दिसत आहे.

अध्यादेश आल्यानंतरच कार्यवाही सुरू होईल, अशी चर्चा आहे. ज्यांना मागूनही उमेदवारी मिळाली नाही, अशा नाराजांना स्वीकृत सदस्य म्हणून सत्ताधारी व विरोधी पक्षांकडून स्वीकृत सदस्य म्हणून संधी दिली जाऊ शकते. राज्य सरकारने अध्यादेश न काढल्याने स्वीकृत सदस्य निवडीबद्दल सध्या वातावरण शांत दिसत आहे. जिल्हा परिषदेच्या सूत्रांनी सांगितले की, सरकारकडूनच अध्यादेश न आल्याने आम्ही शांत आहोत. अध्यादेश आल्यानंतर अनेक इच्छुकांनी लावली फिल्डिंग स्वीकृत सदस्यांची निवड होईल. जिल्हा परिषदेत १० टक्क्यांप्रमाणे सहा सदस्य स्वीकृत म्हणून येऊ शकतात. त्यामुळे सदस्य संख्येच्या बेरजेवरून कोणाचे किती स्वीकृत सदस्य हे ठरेल. स्वीकृत सदस्य आले तर सदस्य संख्या आणखी वाढणार आहे. जिल्हा परिषदेत स्वीकृत सदस्यांचा प्रयोग पहिल्यांदाच होत आहे. त्यामुळे इच्छुकांची संख्या सुद्धा मोठी असणार आहे. जिल्हा परिषदेतील सत्ताधारी आणि विरोध कोण कोणाला न्याय देणार, हे निवडीनंतरच समोर येणार आहे. सध्या जिल्हा परिषदेत आलेल्या नव्या कारभाऱ्यांनी कारभार पाहणे सुरू केले आहे. सभापतींच्या दालनाची सध्या दुरूस्ती, फर्निचर करणे सुरू आहे. त्यामुळे पदाधिकाऱ्यांना बसण्यासाठी त्यांची दालने खुली नाहीत. अध्यक्ष, उपाध्यक्षांची दालने सुस्थितीत आहेत. इतर पदाधिकाऱ्यांची सुस्थितीत करण्याचे काम सुरू आहे.

## मीटर बॉक्सला आग जीवितहानी टळली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल : शहरातील औसा रोडवरील नारायण नगर भागात इमारतीबाहेरील भिंतीवर लावलेल्या मीटर बॉक्सला शॉर्टसर्किटने आग लागल्याची घटना बुधवारी सायंकाळी ५.३० च्या सुमारास घडली. इमारतीमध्ये अडकलेल्या १५ जणांना अग्नीशमन दलाने सुखरूप बाहेर काढले. १ जण जखमी झाला असून येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहे. नारायणनगर येथील नागेश प्रतापे यांनी इमारतीला आग लागल्याची माहिती अग्निशमन दलाला दिली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या दोन तुकड्या घटनास्थळाकडे रवाना झाल्या. अग्निशमन दलाचे अधिकारी बापु जाधव, चालक बाबू सय्यद, सुजीत कल्याणकर, अमोल वाघमोडे, प्रवीण खरसे यांनी अथक परिश्रम करून इमारतीमध्ये अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढले. यामध्ये १ जण जखमी झाले होते. त्यांना तत्काळ अग्निशमन दलाच्या गाडीत उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. संबंधित रुग्णाची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. नुकसानीचा अहवाल अद्याप प्राप्त झाला**

## ग्लोबल नॉलेज स्कूलचा निकाल शंभर टक्के

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** येथील ग्लोबल नॉलेज स्कूलचा सीबीएसई बोर्ड परीक्षेचा १०० टक्के निकाल लागला. पियूष परांडे ९८ टक्के गुणांसह शाळेतून प्रथम तर जिया शेख, बालाजी मुंडे ९५ टक्के गुण घेऊन द्वितीय आले. आयुष कदम व यश ताकबीडवे ने ९४ टक्के गुण घेऊन तृतीय येण्याचा मान मिळवला.

केंद्रीय माध्यमिक शिक्षा बोर्ड (सीबीएसई) नवी दिल्लीच्या वतीने परीक्षा घेण्यात आली होती. दरवर्षीप्रमाणे यावर्षीही यशाची उज्वल परंपरा शाळेने कायम राखली. शाळेची सर्व ८० मुले प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाली. ९० पेक्षा जास्त गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा विषयनिहाय निकाल पाहता संगणकात ४२, हिंदीत २५, समाजशास्त्र २३, इंग्रजीत १२, गणित ०७, विज्ञान ०९, अशा प्रकारे सर्व विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले. या यशासाठी संस्थेचे अध्यक्ष रमेश बिरादार, संचालक सुजित बिरादार, प्राचार्य आम्रपाली सरवदे, उपप्राचार्य किरण देशपांडे, रामेश्र्वरी कदम, वाघंबर उबाळे, धम्मानंद सरवदे, ज्योतीराम पवार, कवीश्र्वर मडिले, सुप्रिया चामले यांचे मार्गदर्शन लाभले.

### डॉ. आंबेडकर जयंतीदिनी मिरवणुकीत केलेल्या ध्वनी प्रदूषणाविरुद्ध लातूर पोलिसांची कारवाई

## डीजे चालक, मालक व जयंती मंडळ पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ एप्रिल :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी मोठ्या प्रमाणात मिरवणुका काढण्यात आल्या. डीजे च्या तालावर तरुणाई थिरकताना पाहायला मिळाली. यादरम्यान झालेल्या ध्वनी प्रदूषणाविरुद्ध लातूर पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला आहे. ध्वनी प्रदूषणास कारणीभूत ठरलेल्या डीजे चालक, मालक व जयंती मंडळ पदाधिकाऱ्यांवर एकूण ७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.तर अन्य १५ जणांविरुद्धचे प्रस्ताव तयार करून ते सक्षम अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आले आहेत.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त लातूर जिल्ह्यात विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात मिरवणुका व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. जयंतीनिमित्त संपूर्ण जिल्हाभरात विविध जयंती मंडळांनी अतिशय उत्साहाने सांस्कृतिक कार्यक्रम, रक्तदान शिबिर, देखावे, व्याख्याने तसेच इतर चांगल्या उपक्रमातून जयंती साजरी करण्यात आली. जयंती मधून जिल्हाभरात अतिशय शांतता आणि सभ्यता याचे अखंड दर्शन घडवीत जयंती मंडळ व नागरिकांनी अतिशय उत्साहात प्रशासनाचे सर्व नियम पाळून आणि सहकार्य करून जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त पोलिसांचा मोठा बंदोबस्त लावण्यात आला होता.

सदर जयंती मिरवणूक कार्यक्रमादरम्यान ध्वनी प्रदूषण नियमांचे उल्लंघन होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी लातूर जिल्हा पोलीस दलाकडून विशेष वेळोवेळी आवाहन करण्यात आले होते. या संदर्भाने संबंधित जयंती मंडळांना पूर्वसूचना देऊन नियमांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्याप्रमाणे जिल्हाभरातील सर्व जयंती मंडळाने दिलेल्या आव्हानाला सकारात्मक प्रतिसाद देऊन जयंती मिरवणुका उत्साहात काढून कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्र्न निर्माण न होता शांततेत पार पाडून प्रशासनास सहकार्य केले.

मात्र, काही अपवादात्मक ठिकाणी नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्याने पोलीसांनी तत्काळ कारवाई करत संबंधित डीजे चालक, मालक व जयंती मंडळ पदाधिकाऱ्यांविरुद्ध एकूण ७ गुन्हे दाखल केले आहेत. तर १५ जयंती समिती व डीजे चालकाविरुद्ध सविस्तर प्रस्ताव तयार करून पाठविण्यात आले आहे.

पोलीस स्टेशननिहाय गुन्हे दाखल करण्यात आलेल्याची माहिती अशी : उदगीर शहर - ५ गुन्हे, अहमदपूर- १ गुन्हा, किनगाव- ०१ गुन्हा ध्वनी प्रदूषण करणारे मंडळे, डीजे चालकाविरुद्ध सविस्तर प्रस्ताव तयार करून सक्षम प्राधिकार्याकडे पाठविण्यात आले असून त्यात शिवाजीनगर पोलीस ठाणे लातूर, पोलीस ठाणे गांधी चौक, लातूर व विवेकानंद चौक पोलीस ठाण्याचे प्रत्येकी चार प्रस्ताव एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत २ तर चाकूर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक प्रस्ताव दाखल करण्यात आला आहे. याप्रमाणे ध्वनी प्रदूषण करणाऱ्या जयंती समिती पदाधिकारी डीजे चालक-मालक यांच्यावर कारवाई करण्यात आले असून मशीन द्वारे ध्वनी पातळी (डेसिबल) मोजणी करून करण्यात आली आहे तसेच काही ठिकाणी डीजे साहित्य जप्त करून पुढील तपास व कारवाई सुरू आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व जयंती मंडळांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम व उपक्रम घेऊन अतिशय उत्साहात प्रशासनास सहकार्य करून जयंती साजरी केली. परंतु लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना वारंवार सूचना देऊनही काही अपवादात्मक मंडळांकडून नियमांचे उल्लंघन झाल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. सार्वजनिक आरोग्य, शांतता व कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरू राहतील. सर्व नागरिक व आयोजकांनी शासन नियमांचे पालन करून सण-उत्सव शांततेत व कायद्याच्या चौकटीत साजरे करावेत, असे आवाहन करण्यात येत आहे.

## रिलायन्स लातूर पॅटर्नचा दबदबा!



**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** श्री. संगमेश्र्वर चॅरिटेबल ट्रस्ट संचलित श्री. त्रिपुरा कनिष्ठ विज्ञान महाविद्यालय तथा रिलायन्स लातूर पॅटर्न या संस्थेने छऊ- २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत पुन्हा एकदा लातूरच्या शैक्षणिक परंपरेला गौरव मिळवून दिला आहे. ऐतिहासिक ट्रेंड आणि सध्याच्या परीक्षेच्या आकडेवारीनुसार ND- परीक्षेसाठी सुमारे २.५ ते ३ लाख विद्यार्थी देशभरातून बसतात. अशा तीव्र स्पर्धेत मिळवलेले हे यश अत्यंत उल्लेखनीय ठरले आहे. {द. ०८ एप्रिल २०२६ रोजी जाहीर झालेल्या ND- २०२६ परीक्षेच्या निकालात चि. पवन राऊत याने -LL INDIA RANK (-IR) ५८१ मिळवत संस्थेचा झेंडा देशपातळीवर उंचावला आहे.

गुणवत्ता, शिस्तबद्ध प्रशिक्षण आणि स्पर्धात्मक वातावरण यांचा उत्कृष्ट संगम साधत RELIANCE LATUR PATTERN ने पुन्हा एकदा विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहोचवले आहे. नियोजनबद्ध अभ्यास पद्धती, अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन, नियमित टेस्ट सिरीज व सखोल विश्र्लेषण तसेच छऊ- डडइ साठी विशेष प्रशिक्षण हे या यशामागील प्रमुख घटक ठरले आहेत.

चि. पवन राऊत याचे हे यश केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण लातूर जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब आहे. छऊ- द्वारे भारतीय सशस्त्र दलात अधिकारी बनण्याच्या त्याच्या प्रवासाची ही एक भक्कम व अभिमानास्पद सुरुवात आहे. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. उमाकांत होनराव सर, सचिव व प्राचार्या सौ. सुलक्षणा केवळराम, कार्यकारी संचालक ओंकार होनराव, शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## नळाला येणारे पाणी पिण्यायोग्य !

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** शहरातील नागरिकांना मनपाच्या वतीने पिण्यासाठी पुरविले जाणारे पाणी पिवळसर दिसत असले तरी ते पिण्यायोग्य असल्याचा निर्वाळा तज्ञांनी दिला आहे. या पाण्याची दैनंदिन तपासणी केली जात असून बुधवारी मनपा पदाधिकारी व अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तज्ज्ञांनी या पाण्याची तपासणी केली असल्याची माहिती लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने देण्यात आली.



धनेगाव येथील मांजरा प्रकल्पातून लातूरसाठी पाणी उचलण्यात येते. सध्या पाटबंधारे विभागाकडून कॅनलद्वारे पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे धरणातील पाणी ढवळले जात आहे.

परिणामी पाण्याच्या तळाशी साठलेला गाळ, सेंद्रिय घटक व शेवाळ पाण्यात मिसळून त्याला पिवळसर रंग येत आहे. धरणातील पाणीपातळी घटलेली असून वाढत्या तापमानामुळे पाण्यात विरघळलेल्या ऑक्सिजनचे प्रमाण कमी झाले आहे. यामुळे सूक्ष्म सेंद्रिय घटकांची वाढ अधिक प्रमाणात होत आहे. हे पाणी शुद्धीकरण करताना क्लोरीनच्च्या संपर्कात आल्यानंतर रासायनिक अभिक्रियांमुळे त्याचा रंग किंचित पिवळसर दिसतो. ही घटना नैसर्गिक असून त्याचा पाण्याचा गुणवत्तेवर घातक परिणाम होत नाही, असे तज्ज्ञांनी सांगितले. जिल्हा सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळेकडून या पाण्याची दैनंदिन तपासणी केली जात आहे.

प्रयोगशाळेच्या अहवालानुसार हे पाणी पिण्यास योग्य आहे, असेही मनपाच्या वतीने सांगण्यात आले.

नागरिकांनी खबरदारी म्हणून पाणी उकळून, गाळून व थंड करून वापरावे. पाण्याचा पिवळसरपणा कमी करण्यासाठी जलशुद्धीकरण प्रक्रियेत ब्लिचिंग पावडर, तुरटी याचा नियंत्रित वापर करावा.

प्रभावी ऑक्सिडेशन व निर्जंतुकी करणासाठी क्लोरीन डाय-ऑक्साइड वापरावे, असेही सांगण्यात आले आहे. बुधवारी महापौर जयश्रीताई सोनकांबळे, आयुक्त श्रीमती मानसी, उपमहापौर ॲड. स्नेहल उटगे, सभागृह नेते विजयकुमार साबदे, स्थायी समिती सभापती सचिन बंडापल्ले, नगरसेवक किरण जाधव, युनुस मोमीन, कार्यकारी अभियंता विजयकुमार चव्हाण, जिल्हा प्रयोगशाळा तज्ज्ञ अजित पवार यांनी हरंगुळ जलशुद्धीकरण केंद्रास भेट दिली. तांत्रिक तज्ज्ञ यांना बोलावून माहिती घेतली. तांत्रिक बाबी समजून घेतल्या.

लातूर : वाढत्या उष्म्यामुळे दुपारच्या दरम्यान लातूर शहरातील रहदारीवर मोठा परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. उन्हाच्या झळांपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी नागरिक टोप्या, रुमाल, गमच्यांचा वापर करताना दिसून येत आहेत.

नोंदणी क्रं. एफ-५८९१ (लातूर)
एस. एफ. एस-२०१६/
प्र.क्र.६९एम.एस.-२
UDISE: २७२८०३००११६

**श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा**
**ता. औसा जि.लातूर**

**जाहिर प्रगटन**

**शाळेचे हस्तांतर करणे बाबत**

हस्तांतर करुन देणारी संस्था श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता.औसा जि.लातूर द्वारा संचलित स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता. औसा जि.लातूर हि शाळा हस्तांतर करुन घेणारी संस्था नवजीवन सेवाभावी संस्था औसा ता. औसा जि.लातूर या संस्थेवर विद्यार्थ्याचे हित लक्ष्यात घेता लिहुन देणार व घेणार संस्थेचे अध्यक्ष / सचिव या दोन्ही संस्थेने ठराव पास करुन हस्तांतर करुन घेण्याचा व देण्याचा ठराव घेतला असुन सदर ठराव ही विना मोबदला घेतला आहे. साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था औसा ता. औसा द्वारा संचलीत स्पर्श इंग्लिश स्कूल औसा ता.औसा जि.लातूर हि शाळा इंग्रजी माध्यमाची असुन स्वयंम अर्थ तत्वार मान्यता आहे. शाळा हस्तांतर बाबत लातूर जिल्हा औसा ता. औसा जि.लातूर तालुकाच्या व जिल्ह्यातील सर्व लोकांना जाहिर प्रगटन द्वारे सुचित करण्यात येते शाळा हस्तांतरन बाबत कोणाची काही हरकत व उजर असल्यास शिक्षण अधिकारी माध्यमिक लातूर व उपसंचालक शिक्षण विभाग लातूर विभाग लातूर यांना जाहिर प्रगटन दिल्यापासुन १५ दिवसाच्या आत सादर करावयाचे आहे. १५ दिवसाच्या नंतर आक्षेप आल्यास ग्राहय धरता येणार नाही. व त्यानंतर हस्तांतरची कार्यवाही करण्यात येईल. जाहिर प्रगटन देणार व घेणार संस्था

**स्वाक्षरित/-**
**अध्यक्ष/सचिव**
श्री साई बहुउद्देशीय सेवाभावी संस्था,
औसा ता. औसा जि. लातूर

## सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर जिल्ह्यात मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १७ एप्रिल :** माजी मंत्री, सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वतीने संपूर्ण जिल्ह्यात भव्य मोफत नेत्र तपासणी, मोफत चष्मे वाटप व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. १८ एप्रिल रोजी जिल्ह्यातील विविध १३ केंद्रांवर हे शिबिर पार पडणार असून, जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन लातूर जिल्हा बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे.

लातूर जिल्हा बँकेने नेहमीच सामाजिक प्रश्र्नांवर आपली बांधिलकी जपली आहे. ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिक आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांच्या संकल्पनेतून या आरोग्य शिबिराचे नियोजन करण्यात आले आहे. वाढत्या वयानुसार निर्माण होणारे दृष्टीदोष आणि मोतीचिंदुच्या समस्यांवर वेळीच उपचार व्हावेत, हा या मागचा मुख्य हेतू आहे. १८ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजेपासून खालील ठिकाणी ही शिविरे सुरू होतील. लातूर ग्रामीणः ग्रामीण रुग्णालय, बाभळगाव, सार्वजनिक स्टेज सभागृह, बोरगाव काळे, लातूर शहरः माता रमाई आंबेडकर रुग्णालय, सम्राट चौक लातूर, पांडुरंग मंगल कार्यालय, दीपज्योतीनगर लातूर, बाजार समिती सभागृह, रेणापूर, वादव मंगल कार्यालय, बेलकुंड, ता. औसा, जिजाऊ चौक, निलंगा, बिराजदार नेत्र रूग्णालय, शाहू चौक उदगीर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर सभागृह, तिरुका, ता. जळकोट, ग्रामीण



रुग्णालय, अहमदपूर, ग्रामीण रुग्णालय, चाकूर, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक परिसर शिरूर अनंतपाळ बोरोळ चौक, देवणी या ठिकाणी ही शिबिरे होणार आहेत.

तज्ज्ञ डॉक्टरांकडून डोळ्यांची मोफत तपासणी. तपासणीनंतर गरजूंना मोफत चष्म्यांचे वाटप करण्यात येणार आहे. मोतीबिंदू आढळून आलेल्या रुग्णांवर पुढील शस्त्रक्रिया मोफत केली जाणार आहे.

ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिक आणि गरजू रुग्णांना डोळ्यांच्या उपचारासाठी शहरात येणे अनेकदा शक्य नसते. ही बाब लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्यात मध्यवर्ती ठिकाणी ही सोय करण्यात आली आहे. लातूर जिल्हा बँकेच्या वतीने सर्व शाखा आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांमार्फत या शिबिराची जय्यत तयारी करण्यात आली आ हे. या संधीचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपल्या जवळच्या शिबिर केंद्रावर उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा बँकेच्या संचालक व प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# ...तरच थांबेल विकृतीची पुनरावृत्ती

महाराष्ट्रासारख्या सुसंस्कृत, प्रगत, समंजस आणि प्रगल्भ भूमीला सध्या एका भीषण विकृतीने ग्रासले आहे. नाशिक, परतवाडा-अचलपूर, आर्णी असो की मूल शहर, बातम्यांचे मथळे तेवढे बदलत आहेत. त्यामागची काळी कृत्ये आणि स्त्रीजन्म घेतलेल्या पीडितांचे अश्रू मात्र सारखेच आहेत. त्यातील अनेक प्रकरणांना 'लव्ह जिहाद'चा आयामही आहे. लव्ह जिहाद हा आता हा शब्द केवळ राजकीय वादविवादाचा विषय उरलेला नाही. सुनियोजित गुन्हेगारीचे 'मॉडेल'चे म्हणूनही हा प्रकार समोर येत आहे. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीची टीसीएस कंपनी. अभियांत्रिकी महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेले हजारो विद्यार्थी टीसीएसकडे रोजगाराच्या आशेने बघतात. या कंपनीच्या नाशिक कार्यालयात महिला कर्मचाऱ्यांवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनांमुळे मोठा गदारोळ उडाला आहे. गोमांस खाण्यासाठी दबाव टाकणे, हिंदू देव-देवतांची खिल्ली उडवणे, हिंदू मुलींना आमिष दाखवून अत्याचार करणे असा सारा बीभत्स प्रकार तिकडे घडला. त्यात कळस म्हणजे, 'द केरला स्टोरी'मध्ये जे दाखवले, तसेच कारस्थान या 'टीसीएस'च्या कार्यालयात घडले. कार्मिक व्यवस्थापक असलेल्या विशिष्ट समाजाच्या अधिकारी महिलेने स्वधर्माच्या कर्मचाऱ्यांशी हिंदू मुलींना ठरवून जोडले. धर्मांतर आणि अत्याचारासाठी प्रवृत्त करण्याबाबत तिच्यावर लावण्यात आलेला आरोप हा 'लव्ह जिहाद'च आहे. नाशिकच्या खरात प्रकरणाने समाजाची झोप उडवली आणि त्यानंतर गावागावांतून अत्याचाराची प्रकरणे बाहेर येण्याचा वेग वाढला. त्याच विकृतीची पुनरावृत्ती महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतून-गावांतून होताना दिसत आहे. अशा सर्व घटनांकडे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न म्हणून पाहणे पुरेसे नाही, तर त्यामागची कट्टरपंथी मानसिकता आणि सामाजिक विघटनाचे षडयंत्र समजून घेणे गरजेचे झाले आहे.

अमरावती जिल्ह्यातील परतवाडा-अचलपूरच्या घटनेत विशिष्ट राजकीय विचारसरणीच्या कार्यकर्त्याने ज्या प्रकारे अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण करून त्यांचे आक्षेपार्ह छायाचित्र समाजमाध्यमांवर प्रसारित केले, ते सर्वसामान्यांना धक्का देणारे आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील मूल येथे 'स्नॅपचॅट'सारख्या 'ॲप्स'चा वापर करून मुलींना विश्वासात घेणे, त्यांची खाजगी चित्रफीत मिळवणे आणि त्यानंतर त्यांना 'ब्लॅकमेल' करीत लाखो रुपयांचे दागिने व रोकड उकळण्याचा धक्कादायक प्रकार हा 'फायनान्शिअल टेररिझम' म्हटला पाहिजे. यवतमाळ जिल्ह्यातील आर्णीच्या घटनेत प्रेमाचे आमिष दाखवून अवघ्या सोळा वर्षांच्या अल्पवयीन मुलीचे आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आले. केवळ ग्रामीण किंवा निमशहरी भागातच हे संकट मर्यादित राहिलेले नाही. सुशिक्षित आणि उच्चभ्रू समजल्या जाणाऱ्या 'कॉर्पोरेट' जगालाही ही विषवल्ली विळखा घालत आहे. कामाच्या ठिकाणी देखील जात आणि धर्माच्या आधारावर भेदभाव होणे आणि महिला कर्मचाऱ्यांच्या शोषणाचे प्रकार घडणे हा नवा 'सोशल ट्रेंड' होऊ पाहत आहे. अशा अग्रगण्य कंपन्या अंतर्गत कलहाने आणि शोषणाने पोखरल्या जातात, तेव्हा ती केवळ प्रशासकीय चूक उरत नाही. ते एका मोठ्या सामाजिक रोगाचे लक्षण ठरते. कामाच्या ठिकाणी सुरक्षित वातावरण असणे हा विशेषतः महिला कर्मचाऱ्यांचा अधिकार आहे. तिथेही धर्मांध किंवा जातीय मानसिकतेतून होणारे शोषण सुसंस्कृत समाजासाठी लाजिरवाणेच आहे. ही विकृती तथाकथित 'व्हाईट कॉलर्ड' गुन्हेगारीच्या रूपात आपल्या जागतिक महासत्ता होण्याच्या स्वप्नांनाही सुरुंग लावत आहे. बहुतांश घटनांतील साम्य म्हणजे, पीडित प्रामुख्याने हिंदू समाजातील तरुणी किंवा अल्पवयीन मुली आहेत आणि आरोपी एका विशिष्ट समुदायातील संघटित आणि विघातक विचारसरणीचे आहेत. हे असे काही ऐकले, वाचले की कानात मुंग्यांचे वारूळ उठते. खरे तर, या उघड झालेल्या काही वाणगीदाखल घटना आहेत. असे कितीतरी प्रकार गावातल्या गावात घडून आणि विरून गेले असतील.

राष्ट्रीय गुन्हे नोंदणी विभागाच्या (एनसीआरबी) अहवालानुसार आणि विविध महिला संघटनांनी गोळा केलेल्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी हजारो मुली बेपत्ता होत आहेत. त्यातील मोठी संख्या खोट्या प्रेमाच्या जाळ्यात अडकलेल्या मुलींची असते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर केरळ, कर्नाटक आणि आता उत्तर भारतातही अशा घटनांचे प्रमाण ३० ते ४० टक्क्यांनी वाढल्याचे विविध अहवाल सांगतात. यातील सर्वाधिक धक्कादायक बाब म्हणजे, आरोपींना स्थानिक पातळीवर राजकीय आणि धार्मिक संघटनांचे पाठबळ मिळते. अचलपूरमधील 'एमआयएम' कार्यकर्त्याच्या अटकेतून ते सिद्धही झाले आहे. अशा विकृत प्रवृत्तींचा कठोर शब्दांत निषेध करणे पुरेसे नाही. ही प्रवृत्ती समाजात कर्करोगासारखी पसरत असल्याने तिला कायमचे संपविले पाहिजे. प्रेमाच्या किंवा कथित सौहार्दाच्या बनावाखाली चालणारा हा 'जिहाद' आहे, हे समस्त हिंदू समाजाने समजून घेतले पाहिजे. या प्रवृत्तींना वेळीच ठेचून काढणे हे समाजाचे कर्तव्य आहे आणि ती गरजही आहे. एखादा समाज आपल्या लेकीबाळींच्या सुरक्षिततेबद्दल चिंतित होतो, तेव्हा त्या समाजापुढे असे काही तरी संकट असते. ते दिसत नसते, पण समाजाला पोखरत असते. त्यामुळे प्रत्येकाने सावध असणे आणि आपल्या मुलांकडे लक्ष ठेवणे अपरिहार्य आहे. आधुनिकता वर्ज्य नाही, पण त्या नावाने अतिरेक होत असेल तर तो थांबविलाच पाहिजे. अशा घटनांतील गुन्हेगारांना कठोरतम शिक्षा तर व्हायलाच हवी, शिवाय त्यांच्या पाठीशी उभ्या राहणाऱ्या राजकारण्यांच्याही शक्तिपात होणे आवश्यक आहे. या समाजकंटकांचे अस्तित्व कायम असणे हा भारताच्या भविष्यासाठीचा अत्यंत मोठा धोका आहे.

या भीषण परिस्थितीवर केवळ पोलिस कारवाई हा अंतिम उपाय असू शकत नाही. तो असता तर विकृतींची पुनरावृत्ती समोर आली नसती. खरे तर, ही वैचारिक आणि सामाजिक लढाई आहे. हे हिंदू समाजाविरुद्धचे षडयंत्र आहे. त्यावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पंचपरिवर्तन संकल्पनेतील 'कुटुंब प्रबोधन'सारखा विषय अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. धावपळीच्या कुटुंबव्यवस्थेत संवाद हरवत चालला आहे. मुलांशी मैत्रीचे नाते निर्माण करून, त्यांना सामाजिक धोक्याची जाणीव करून देणे ही पालकांची मोठी जबाबदारी असताना ती पाळली जाताना दिसत नाही. घरात संस्कारांची शिदोरी भक्कम असली तर बाह्य प्रलोभने टिकत नाहीत. घरच्या प्रेमाची सर बाहेरच्या विषाक्त प्रेमाला येऊच शकत नाही. पण त्यासाठी कुटुंबात संवाद आवश्यक आहे. कामाच्या व्यापाच्या नावाखाली ते होत नसेल, तर आपले नुकसान ठरलेले आहे. ते आज होईल किंवा उद्या. हिंदूंनी आता कुटुंबात अधिक लक्ष दिले पाहिजे. आपल्या मुलींना स्वधर्माचा अभिमान आणि अन्यांच्या कट्टरतेचे, वाईट प्रवृत्तीचे वास्तवही समजावून सांगितले पाहिजे. समाज माध्यमांच्या आभासी जगात कोण मित्र आणि कोण शत्रू, हे ओळखण्याची दृष्टी मुलांना देणे आवश्यक आहे. गल्ली आणि मोहल्ला स्तरावर दक्षता समित्या स्थापन करून संशयास्पद हालचालींवर लक्ष ठेवणेही तेवढेच गरजेचे आहे. सामाजिक संघटनांनी अशा विषयांवर सामूहिक बैठक घेऊन दबाव गट निर्माण केले पाहिजे. महाराष्ट्राच्या भूमीला संतांचे आणि वीरांचे अधिष्ठान आहे. येथे छेडछाड किंवा शोषण करणाऱ्यांचे हात छाटणारी शक्ती नेहमीच समोर आली आहे. ती शक्ती जागी केली पाहिजे. काळाची हाक ओळखली पाहिजे. असे प्रकार ही सामाजिक आणि सांस्कृतिक आक्रमणाच्या पल्याड हिंदू समाजाची कुटुंबे नासवण्यासाठी घडविले जात आहेत. कायद्याचा बडगा आणि संस्कारांची ढाल या दोन्हींच्या जोरावरच आपण या विळख्यातून नव्या पिढीला वाचवू शकू. प्रशासन आणि न्यायव्यवस्था त्यांचे काम करेलच, पण समाज, कुटुंब, पालक म्हणून प्रत्येकाने काळजी घेतली पाहिजे आणि संघटित होऊन अशा विकृतीचा समूळ नाश करण्यासाठी सज्ज झालो पाहिजे. विकृतीची पुनरावृत्ती होत असेल तर त्यात विकृतांचा दोष असतोच, पण अशा पुनरावृत्तीत ज्यांना टार्गेट केले जाते, ज्यांचे नुकसान होते, त्यांचा अजिबातच दोष नाही, असेही म्हणण्यात अर्थ नाही. त्यांना रोखायचे असेल तर आपण संघटित व सक्रिय होऊन हिंदू समाजातील मुलीबाळींच्या संरक्षणासाठी सिद्ध झाले पाहिजे.

---

## विशेष

# लॉजिस्टिक क्षेत्रात संरचनात्मक बदल

**प्रा. सुखदेव बखळे**

भारताच्या बदलत्या परिदृश्यात वेअरहाऊसिंग म्हणजेच साठवणूक व्यवस्था ही केवळ पूरक सुविधा राहिलेली नाही, तर संपूर्ण पुरवठा साखळीची मध्यवर्ती कडी बनली आहे. पूर्वी गोदामे म्हणजे वस्तू ठेवण्याची जागा एवढ्यापुरती मर्यादित समज होता; मात्र आज ती इन्व्हेंटरी व्यवस्थापन, खर्च नियंत्रण, वितरण कार्यक्षमता आणि सेवा गुणवत्तेचा मुख्य आधार बनली आहेत. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा विस्तार हा केवळ पायाभूत वाढ नसून आर्थिक व्यवस्थेतील गुणवत्ताबदलाचा संकेत आहे. शेतीक्षेत्रात या बदलाची विशेष झलक दिसते. अन्नधान्य उत्पादनात झालेली वाढ, सरकारी खरेदीचा विस्तार आणि वैज्ञानिक साठवणुकीवर दिला जाणारा भर यामुळे आधुनिक गोदामे आणि 'सिलो' पायाभूत सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. भारताच्या अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नधान्याची खरेदी, साठवणूक आणि वितरण यामधील सुसूत्रता टिकवून ठेवण्यासाठी मजबूत वेअरहाऊसिंग प्रणाली अपरिहार्य ठरते. नोव्हेंबर २०२५ पर्यंत केंद्र सरकारच्या अन्नधान्य साठ्यासाठी सुमारे ९२ दशलक्ष टन क्षमतेची साठवणूक व्यवस्था उभी करण्यात आली आहे. यामध्ये सुमारे ८२ दशलक्ष टन संरक्षित साठवणूक आणि उर्वरित 'सीएपी' स्वरूपातील साठवणूक समाविष्ट आहे. 'फूड कॉर्पोरेशन ऑफ इंडिया' (एफसीआय) आणि राज्य सरकारी संस्था यामध्ये प्रमुख भूमिका बजावत आहेत, तर 'सेंट्रल वेअरहाऊस कॉर्पोरेशन' आणि राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स संचालनात मदत करतात. 'एफसीआय'ने एकट्यानेच सुमारे ४८ दशलक्ष टन साठवणूक क्षमता उभारली असून त्याचा वापर जवळपास ८८ टक्के आहे. हे प्रमाण खरेदी आणि साठवणूक यांच्यातील समन्वय दाखवते.

आज 'एफसीआय'च्या सुमारे ६७ टक्के साठवणूक सुविधा भाडेतत्त्वावर आहेत. यामुळे पीक हंगामातील वाढत्या गरजेनुसार लवचीकता मिळते आणि भांडवली खर्च कमी राहतो. उत्तर भारतात या साठवणुकीचे सर्वाधिक प्रमाण आढळते. तिथे गहू आणि तांदूळ खरेदी मोठ्या प्रमाणावर होते. राज्यस्तरीय यंत्रणाही या व्यवस्थेत तितक्याच महत्त्वाच्या आहेत. राज्य वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन्स आणि इतर संस्थांकडे मिळून सुमारे ४३ दशलक्ष टन साठवणूक क्षमता आहे. पश्चिम आणि उत्तर भागात याचे प्रमाण अधिक असून उत्पादन आणि उपभोग या दोन्ही दृष्टिकोनांमधून महत्त्वाचे आहे. याशिवाय 'सेंट्रल वेअरहाऊसिंग कॉर्पोरेशन'कडे ७४१ गोदामे असून त्यांची एकूण क्षमता सुमारे १५ दशलक्ष टन आहे. रेल्वे संलग्न गोदामे, कंटेनर फ्रेट स्टेशन, इनलँड कंटेनर डेपो आणि तापमान नियंत्रित सुविधा यामुळे या नेटवर्कची कार्यक्षमता वाढते. या साऱ्या विस्तारासोबतच नियमन आणि पारदर्शकतेतही मोठी सुधारणा झाली आहे. 'वेअरहाऊस डेव्हलपमेंट ॲण्ड रेग्युलेटरी ऑथॉरिटी'च्या चौकटीमुळे वेअरहाऊसिंग क्षेत्र अधिक संघटित झाले आहे. सप्टेंबर २०२५ पर्यंत १०,८०० हून अधिक गोदामे नोंदणीकृत झाली असून ७.३ लाखांहून अधिक वेअरहाऊस रिसीट्स जारी करण्यात आल्या आहेत. या प्रणालीमुळे शेतकरी, व्यापारी आणि कृषी उद्योगांना औपचारिक कर्जप्रवाह उपलब्ध झाला आहे. ते ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी एक मोठे सकारात्मक पाऊल आहे. औद्योगिक आणि ई-कॉमर्स क्षेत्रातही वेअरहाऊसिंगची भूमिका झपाट्याने बदलत आहे.

आज तृतीय पक्ष लॉजिस्टिक्स, ओम्नीचॅनल विक्री आणि 'क्विक कॉमर्स'च्या वाढत्या ट्रेंडमुळे दर्जेदार (ग्रेड ए) गोदामांची मागणी वाढत आहे. विशेषतः टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये या सुविधांचा विस्तार होत आहे. ते प्रादेशिक संतुलनाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याच वेळी कोल्ड चेन क्षेत्रही धोरणात्मकदृष्ट्या अधिक महत्त्वाचे ठरत आहे. अन्नधान्याची नासाडी कमी करणे, औषध आणि लसींच्या पुरवठा साखळीला बळकटी देणे आणि नाशवंत वस्तूंच्या निर्यातीला चालना देणे या सर्व बाबींसाठी मजबूत कोल्ड स्टोरेज नेटवर्क आवश्यक आहे. त्यामुळे वेअरहाऊसिंगचा हा भाग केवळ आर्थिक नव्हे, तर सार्वजनिक आरोग्य आणि अन्नसुरक्षेशीही जोडला गेला आहे. या सर्व घडामोडींचा एकत्रित विचार केल्यास स्पष्ट होते, की भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र हे आता अर्थव्यवस्थेच्या पाठीचा कणा बनत आहे; मात्र या प्रगतीसोबत काही आव्हानेही आहेत, जसे की तंत्रज्ञानाचा व्यापक वापर, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा आणि खाजगी गुंतवणुकीसाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे. भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्रात घडणारा बदल आता केवळ विस्तारापुरता मर्यादित राहिलेला नाही, तर गुणात्मक परिवर्तनाकडे झेपावू लागला आहे. पारंपरिक गोदामांच्या पलीकडे जाऊन आधुनिक साठवणूक प्रणाली, तंत्रज्ञानाचा वाढता वापर आणि शाश्वततेकडे झुकणारे धोरणात्मक निर्णय यामुळे हे क्षेत्र नव्या टप्प्यावर पोहोचत आहे. या प्रक्रियेत सिलो साठवणूक, ग्रेड-ए औद्योगिक वेअरहाऊसिंग, 'कोल्ड चेन नेटवर्क' आणि 'ईएसजी' आधारित मॉडेल्स ही चार प्रमुख प्रवाह ठळकपणे दिसून येतात.

पारंपरिक गोदामे अजूनही भारताच्या कृषी साठवणूक व्यवस्थेचा कणा आहेत; मात्र सिलो प्रणाली आता एक प्रभावी पर्याय म्हणून पुढे येत आहे. विशेषतः गहू साठवणुकीसाठी सिलो अधिक कार्यक्षम ठरत आहेत. पारंपरिक गोदामांमध्ये पाच ते दहा टक्क्यांपर्यंत धान्याची हानी होत असताना सिलोमध्ये ती एक टक्क्यांपेक्षा कमी राहते. याशिवाय कमी जागेत अधिक साठवणूक, यांत्रिक हाताळणी आणि अचूक इन्व्हेंटरी नियंत्रण ही सिलो यंत्रणेची महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. २०२५ च्या मध्यापर्यंत सुमारे तीन दशलक्ष टन सिलो क्षमता कार्यान्वित झाली असून, त्याच प्रमाणात प्रकल्प बांधकामाधीन आणि निविदा प्रक्रियेत आहेत. पंजाब, हरयाणा आणि मध्य प्रदेश या राज्यांमध्ये याचा सर्वाधिक विस्तार दिसतो, जे त्यांच्या गहू उत्पादनातील महत्त्व दर्शवते. या क्षेत्रात 'एफसीआय'ची भूमिका महत्त्वाची आहे. 'एफसीआय'कडे असलेल्या सिलो क्षमतेपैकी बहुतांश क्षमता सार्वजनिक-खाजगी भागीदारी (पीपीपी) मॉडेलवर आधारित आहे. अदानी ॲग्री लॉजिस्टिक, स्नोमॅन लॉजिस्टिक आणि नॅशनल बल्क बँडलिंग कार्पोरेशन यांसारख्या खाजगी कंपन्यांनी या क्षेत्रात तांत्रिक कौशल्य आणि कार्यक्षमतेची नवी पातळी आणली आहे. रेल्वे आणि रस्ते आधारित सिलो मॉडेलमुळे धान्याची जलद वाहतूक आणि कमी नुकसान शक्य होत आहे. औद्योगिक वेअरहाऊसिंग क्षेत्रातही गेल्या दशकात मोठा बदल घडून आला आहे. जागतिक दर्जाच्या ग्रेड-ए सुविधांकडे झुकणारा हा कल स्पष्टपणे दिसतो. यासोबतच शाश्वततेकडेही विशेष लक्ष दिले जात आहे. 'नॅशनल लॉजिस्टिक पॉलिसी'अंतर्गत ग्रीन लॉजिस्टिक्सवर भर देण्यात आला असून सौरऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, पावसाचे पाणी साठवण आणि पुनर्वापर यासारख्या उपाययोजना नव्या वेअरहाऊसिंग प्रकल्पांमध्ये समाविष्ट केल्या जात आहेत. 'ईएसजी' निकषांनुसार उभारलेली गोदामे आता गुंतवणूकदार आणि आंतरराष्ट्रीय कंपन्यांसाठी अधिक आकर्षक ठरत आहेत. याचबरोबर 'बिल्ट-टू-सूट' (बीटीएस) मॉडेलही वेगाने पुढे येत आहे. मोठ्या कंपन्या आपल्या गरजेनुसार सानुकूलित वेअरहाऊस उभारण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे कार्यक्षमतेत वाढ आणि दीर्घकालीन स्थैर्य मिळते. उत्पादन केंद्रे आणि नव्याने विकसित होणाऱ्या बाजारपेठांमध्ये या मॉडेलचा विस्तार होत आहे. या सर्व घडामोडींच्या पृष्ठभूमीवर भारताच्या वेअरहाऊसिंग क्षेत्राचे भवितव्य अत्यंत आशादायक दिसते. एकूणच, भारतातील वेअरहाऊसिंग क्षेत्र आता केवळ सहायक घटक न राहता अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ बनत आहे. तंत्रज्ञान, शाश्वतता आणि धोरणात्मक गुंतवणूक यांच्या साहाय्याने हे क्षेत्र अधिक एकात्मिक, कार्यक्षम आणि जागतिक स्पर्धेसाठी सक्षम होत आहे. पुढील काळात हा बदल केवळ लॉजिस्टिक्स क्षेत्रापुरता मर्यादित राहणार नाही, तर भारताच्या संपूर्ण आर्थिक विकासाचा वेग ठरवणारा निर्णायक घटक ठरणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

---


## वेध

**नीलेश जोशी**

# नेमेचि येतो उन्हाळा...

फेब्रुवारी महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यानंतर विदर्भातील जवळपास सर्वच जिल्ह्यांच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात होते. एप्रिल-मे महिन्यात तर तापमानाचा उच्चांक गाठला जातो. या महिन्यांमधील अनेक दिवस साधारणतः ४३ ते ४६ अंशापर्यंत तापमान कायम राहते. स्वाभाविकच या कालावधीत उष्माघाताचे अनेक बळी जातात. ही परिस्थिती गत काही वर्षांतील आहे असे नसले तरी तापमानाचा उच्चांक गाठणाऱ्या दिवसांमध्ये सतत वाढ होत आहे. म्हणूनच याकडे केवळ ऋतुबदलाचा परिणाम असे न पाहता वाढत असलेल्या तापमानाच्या कारणांची मीमांसा करणे आणि त्यासाठीच्या उपाययोजना सातत्याने, योग्य वेळेत करणे आवश्यक आहे. मुख्यतः वृक्षतोड आणि अन्य मार्गाने पर्यावरणाची होणारी हानी, झपाट्याने वाढत असलेले शहरीकरण सोबतच हवामानातील बदल या सर्वांचा संयुक्त परिणाम तापमान वाढीवर होतो. सतत वाढणारे तापमान हे जीवघेणे ठरत आहे. दरवर्षी उष्माघाताने मृत्यू होणाऱ्यांची संख्या वाढत असल्याचे चित्र आहे. दुर्दैवाने अनेक वेळा उष्माघाताच्या मृत्यूची नोंद योग्य पद्धतीने न झाल्याने प्रत्यक्ष आणि शासकीय आकडेवारीत तफावत जाणवते. यावर्षी देखील वर्धा, अकोल्यात एकाचा उष्माघाताने मृत्यू झाल्याची चर्चा आहे. त्यामुळे मानवी जीविताच्या रक्षणासाठी यावर उपाययोजना गरजेच्या आहेत. 'नेमेचि येतो उन्हाळा' असे म्हणून दुर्लक्ष करणे हे भविष्यातील अडचणी वाढविणारे ठरेल.

सतत वाढणारे तापमान आणि उन्हाळ्यातील उष्माघाताने होणारे मृत्यू ही समस्या केवळ विदर्भातील नागपूर, अकोला, चंद्रपूर, वर्धा, अमरावती या शहरांचीच नव्हे तर महाराष्ट्रातील प्रत्येक गाव, शहर आणि खेड्याची आहे. अशाच प्रकारच्या समस्येने गुजरातमधील अहमदाबाद शहर त्रासले होते. मात्र त्यांनी काही उपाययोजनांची प्रत्यक्ष अंमलबजावणी केली आणि त्यानंतर येथे उष्माघाताच्या मृत्यूच्या संख्येत कमालीची घट झाली. अहमदाबाद हे देशातील 'हिट ॲक्शन प्लॅन' यशस्वीपणे राबविणारे पहिले शहर आहे. २०१० साली भीषण उष्णतेच्या लाटेत अहमदाबाद येथे अनेकांचा मृत्यू झाला. त्यानंतर २०१३ मध्ये स्थानिक महानगरपालिकेने पूर्वसूचना प्रणाली, जनजागृती, नागरिकांनी घ्यावयाची काळजी या मुद्यांवर शासकीय यंत्रणांसह विविध सामाजिक संस्थांनी काम केले. परिणामी उष्माघाताचे मृत्यू घटले. या ॲक्शन प्लॅनला जागतिक आरोग्य संघटनेची मान्यता मिळाली. तर देशातील ३० शहरांनी अशा प्रकारची योजना अंमलात आणली. वाढत्या तापमानामुळे होणाऱ्या मृत्यूसाठी अशा प्रकारची सूक्ष्म योजना करणे आवश्यक असले तरी मुळात तापमान वाढू नये याकरिता देखील सर्वच स्तरातून प्रयत्नांची गरज आहे. खरं तर सर्वत्रच वाढते काँक्रिटीकरण आणि कमी होणारी हिरवळ ही मूळ समस्या आहे. कारण एका संशोधनानुसार, काँक्रिट पृष्ठभाग सूर्य ऊर्जा ८०-९० टक्के शोषतो, तर हिरवळ केवळ २०-३० टक्के उष्णता शोषते. म्हणूनच यावर सर्वोत्तम उपाय हा गाव, खेडे, शहरात ठिकठिकाणी 'हरित पट्टे' निर्माण करणे हा ठरू शकतो. वृक्ष, उद्याने, जलस्रोत, हिरवळ हे केवळ सौंदर्यवर्धनासाठी नसून ती तापमान नियंत्रणाची नैसर्गिक यंत्रणा आहे. 'हरित पट्टे' असलेल्या भागात २ ते ८ अंश सेल्सिअस तापमान कमी असते. तर हिरवळ वाढल्यास हवेतील प्रदूषण देखील २० ते ३० टक्के कमी होते. झाडांच्या सावलीखाली असलेल्या भागात जमिनीचे तापमान १० ते १५ टक्के कमी असते. असे एक ना अनेक फायदे हरित पट्ट्यांचे आहेत. सुदैवाने अद्याप तरी शहरात आणि शहरालगत मोठ्या प्रमाणात शासकीय जागा उपलब्ध असून याठिकाणी प्रशासकीय यंत्रणेसोबत विविध सामाजिक संस्थाद्वारे हरित पट्टे निर्माणाचे कार्य करता येईल. मोठ्या शहरात नागरिकांनी उजाड झालेल्या बगिच्यांच्या संवर्धनासाठी, रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपणासाठी पुढाकार घेत तर शासनाने बांधकाम नियमांमध्ये २० ते ३० टक्के हिरवळ, वृक्षतोडीवर कडक नियंत्रण असे धोरणात्मक निर्णय घेतले तर पुढील काही वर्षांत वाढत्या तापमानाच्या समस्येवर नियंत्रण मिळविता येईल.



आपल्या संस्कृतीत 'माता भूमिः पुत्रोऽहं पृथिव्याः' अर्थात ही वसुंधरा आमची माता आहे आणि आम्ही तिचे पुत्र आहोत, असे म्हटले आहे. म्हणून स्वाभाविकच वसुंधरेच्या रक्षणासाठी आवश्यक असणारी प्रत्येक बाब आपले कर्तव्य आहे. पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण हे देखील महत्त्वाचेच. म्हणूनच रा. स्व. संघाने पंचपरिवर्तनात पर्यावरण या विषयाचाही समावेश केला आहे. वाढते तापमान हे अपमृत्यूला कारणीभूत ठरणारे असून एक प्रकारची ती आरोग्य आणिबाणी म्हणावी लागेल. यावर मात करण्यासाठी समाजातील सज्जन शक्तीला पुढाकार घ्यावा लागेल हे निश्चित!

९४२२८६२४८४

---

## दिल्ली वार्तापत्र

# बिहारमध्ये 'सम्राट' युग सुरू

**श्यामकांत जहागीरदार**

जदयूचे नितीशकुमार यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिल्यामुळे बिहारमधील नितीशयुगाचा अंत झाला असून, भाजपाचे सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यामुळे राज्यात सम्राटयुगाचा प्रारंभ झाला आहे. बिहार ही तशीही सम्राटांची भूमी आहे. सम्राट चौधरी यांच्या शपथविधीने बिहारमध्ये प्रथमच भाजपाचा मुख्यमंत्री झाला आहे. उत्तर भारतातील बिहार हे एकमेव असे राज्य होते, ज्याठिकाणी अनेक वर्षे आघाडीच्या राजकारणात सत्तेत सहभागी असून सुद्धा भाजपचा मुख्यमंत्री कधी झाला नव्हता, भाजपला नेहमी उपमुख्यमंत्रिपदावरच समाधान मानावे लागत होते. बिहारचे नितीन नवीन भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष झाल्यानंतर बिहारमध्ये भाजपाचा मुख्यमंत्री पदारूढ होणे याला निव्वळ योगायोग म्हणता येणार नाही. तर भाजपाच्या प्रदीर्घकाळच्या संयमाच्या राजकारणाला आलेले फळ म्हणायला हरकत नाही.

दुसऱ्या पक्षातून आलेल्या नेत्याला मुख्यमंत्री करण्याची भाजपतील ही दुसरी वेळ आहे. याआधी आसाममध्ये काँग्रेसमधून आलेल्या हिमंता बिस्व सरमा यांच्या गळ्यात भाजपने मुख्यमंत्रिपदाची माळ घातली. भाजपचा हा निर्णय दूरदृष्टीचा होता, यात संशय नाही, तो अचूक ठरला. हिमंता बिस्व सरमा यांना मुख्यमंत्री करण्याच्या निर्णयाचा फायदा भाजपाला फक्त आसाममध्येच नाही तर संपूर्ण ईशान्य भारतात झाला. आता बिहारमध्ये राजद आणि जदयूतून भाजपत आलेल्या सम्राट चौधरी यांना भाजपने मुख्यमंत्री बनवत त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. नितीशकुमार यांचा राज्यातील प्रभाव मोडून काढत भाजपचा विस्तार करण्यासाठी चौधरी यांच्यासारख्या दमदार नेत्याची गरज होती.

सामान्यपणे भाजपमध्ये ज्या नेत्याच्या नावाची मुख्यमंत्रिपदासाठी चर्चा होते, तो मुख्यमंत्री होत नाही, असा अनुभव होता. पण याला सम्राट चौधरी अपवाद ठरले. नितीशकुमार राज्यसभेत जाणार, पर्यायाने मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देत बिहारच्या राजकारणातून बाहेर पडणार हे स्पष्ट झाल्यापासून भाजपचा नवा मुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी यांच्या नावाची चर्चा सुरू झाली होती. ती भाजपा आणि रालोआ विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी त्यांची निवड झाल्यानंतर खरी ठरली. सम्राट चौधरी बिहारचे मुख्यमंत्री होणार याचे संकेत मिळायला सुरुवात झाली होती.



विधानसभा निवडणुकीच्या प्रचारात गृहमंत्री अमित शाह यांनी सम्राट चौधरी यांच्याकडे लवकरच मोठी जबाबदारी देण्याचे संकेत दिले होते. तर तत्कालीन मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी आपल्या समृद्धी यात्रेदरम्यान जमुई येथील सभेत सम्राट चौधरी यांच्या खांद्यावर हात ठेवत ते आपले उत्तराधिकारी असण्याचे संकेत दिले होते. भाजपने बिहारमधील दीर्घकालीन राजकीय समीकरणे डोळ्यासमोर ठेवत सम्राट चौधरी यांना मुख्यमंत्री बनवले आहे. बिहारचे राजकारण हे जातिवादाचे आहे. नितीशकुमार यांनी राज्यातील पिछडा समाजाच्या कुर्मी आणि कोईरी समाजाला हाताशी धरत राजकारण केले, हे पुरेसे नसल्यामुळे त्यांनी अतिपिछडा समाजही आपल्यासोबत आणला. सम्राट चौधरी हे कुशवाह समाजाचे आहे. कुर्मी आणि कोईरी हा समाज लव म्हणून ओळखला जातो, लव आणि कुश असे दोन समाज एकत्र आणत लव-कुशचे राजकारण करण्यासाठी भाजपने सम्राट चौधरी यांची मुख्यमंत्रिपदी निवड केली आहे. जदयूत असताना सम्राट चौधरी आणि नितीशकुमार यांच्यात फारसे पटत नव्हते. चौधरी राजदमधून जदयूत आल्यानंतर जितनराम मांझी यांच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश झाला. पण मांझी यांना हटवून नितीशकुमार मुख्यमंत्री झाल्यावर मात्र त्यांनी आपल्या मंत्रिमंडळात चौधरींना स्थान दिले नाही. नितीशकुमार यांच्यामुळे सम्राट चौधरी यांनी जदयू सोडत भाजपात प्रवेश केला. नितीशकुमार यांनी राजदसोडत पुन्हा रालोआत येण्याचा निर्णय घेतला, तेव्हा त्यांना रालोआत प्रवेश देण्यास ज्या भाजपा नेत्यांनी विरोध केला, त्यात सम्राट चौधरीही होते. पण नंतर भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाच्या सूचनेवरून चौधरी यांनी नितीशकुमार यांच्याशी जुळवून घेतले आणि नितीशकुमार यांनीही चौधरी यांच्याबद्दलचा किंतू आपल्या मनातून काढून टाकला.

बिहारचे राजकारण गेली २० वर्षे नितीशकुमार यांच्याभोवती फिरत होते. नितीशकुमार यांना वगळून कोणत्याच राजकीय पक्षाला बिहारचे राजकारण आतापर्यंत करता आले नाही. त्यामुळे राज्यात कोणत्याही आघाडीचे सरकार आले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच राहात होते. भाजप सोडून राजदसोबत गेले तरी मुख्यमंत्री नितीशकुमारच राहात होते आणि राजदसोडून भाजपासोबत आले तरी नितीशकुमार यांना मुख्यमंत्री करण्याशिवाय पर्याय राहात नव्हता. अनेकवेळा भाजप आणि राजदपेक्षाही नितीशकुमार यांच्या जदयूचे आमदार कमी असतानाही मुख्यमंत्रिपद नितीशकुमार यांच्याकडेच राहत होते.

नितीशकुमार यांची आणखी एक जमेची बाजू म्हणजे त्यांच्यावर कधीही भ्रष्टाचाराचे आरोप झाले नाहीत. प्रदीर्घ काळ मुख्यमंत्री असतानाही भ्रष्टाचाराच्या मुद्यावर आपली पाटी कोरी ठेवणे ही मामुली बाब नाही. नितीशकुमार यांना देशात सर्वांत जास्त काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रम करता आला नाही, पण सर्वांत जास्त म्हणजे दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. २००१ मध्ये नितीशकुमार पहिल्यांदा अल्पकाळासाठी मुख्यमंत्री झाले, पण २००५ च्या विधानसभा निवडणुकीनंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. २००५, २०१०, २०१५, २०२० आणि २०२५ अशा सलग पाच विधानसभा निवडणुका नितीशकुमार यांनी जिंकल्या, दहावेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी त्यांना सहावेळा मुख्यमंत्रिपदाचा राजीनामाही द्यावा लागला. पुन्हा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेण्यासाठी मुख्यमंत्रिपदाचा एवढ्या वेळा राजीनामा देण्याचा नितीशकुमार यांचा विक्रमही कोणाला मोडता येईल, असे वाटत नाही.

सम्राट चौधरी यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यामुळे बिहारला दोन दशकांनंतर प्रथमच विधानसभेत निवडून आलेला नेता मुख्यमंत्री म्हणून मिळाला आहे. मुख्यमंत्रिपदावर असताना एकदाही नितीशकुमार यांनी विधानसभेची निवडणूक लढवली नाही. मागच्या दाराने विधान परिषदेचे सदस्य होत ते मुख्यमंत्रिपदाची शपथ घेत होते. विधान परिषदेचे सदस्य म्हणून सर्वाधिक काळ मुख्यमंत्रिपदावर राहण्याचा विक्रमही देशात नितीशकुमार यांचा असावा.

सम्राट चौधरी यांचे वडील शकुनी चौधरी राजदचे नेते होते. त्यांच्यामुळेच सम्राट चौधरी याचा वयाच्या १९ व्या वर्षी राबडीदेवी मंत्रिमंडळात समावेश झाला. लालूप्रसादांनी त्यांना विधान परिषदेत घेतले, पण त्यांच्या कमी वयावरून वाद झाल्यामुळे त्यांना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला. आज मुख्यमंत्री म्हणून सम्राट चौधरी यांना मोठी संधी मिळाली आहे. या संधीचे सोने करण्याचे आव्हान त्यांच्यासमोर आहे. मुख्यमंत्री म्हणून नितीशकुमार यांचा प्रभाव मोडून काढत आपली छाप उमटवण्याचे काम त्यांना करायचे आहे. आतापर्यंत धडाडीचे नेते म्हणून केलेले काम पाहता सम्राट चौधरी यात यशस्वी होतील, याबाबत शंका नाही.

९८८१७१७८१७

---

### प्रशासन : पदव्यांच्या झगमगाटात हरवलेली मानवी संवेदना

कोणत्याही कार्यालयात अधीक्षक किंवा प्रशासकीय अधिकारी ही पदे व्यवस्थापनाचा कणा मानली जातात. व्यवस्थापन आणि कर्मचारी यांच्यातील मुख्य दुवा म्हणून या पदाची ओळख असते. कर्मचाऱ्यांचे गाऱ्हाणे, त्यांच्या समस्या आणि व्यवस्थापनाचे उद्देश यामध्ये सुवर्णमध्य साधून प्रशासकीय समन्वय राखणे, हे या पदाचे मुख्य कर्तव्य आहे. पूर्वीच्या काळी या पदावर बसलेली व्यक्ती प्रशासनातील गुंतागुंत, नियम आणि परिपत्रकांचा सखोल अभ्यास करून, केवळ कागदी घोडे न नाचवता समस्यांवर ठोस उपाय शोधत असे. मात्र, बदलत्या काळानुसार आणि खाजगी क्षेत्राच्या वाढत्या प्रभावामुळे या पारंपरिक प्रशासकीय पदाचे स्वरूप बदलून ते आता एच. आर. झाले आहे. आज या पदासाठी एम.बी.ए. सारख्या पदव्युत्तर पदव्यांच्या जोरावर भरती करण्याकडे कल वाढला आहे. नाशिकच्या अलिकडील दुर्दैवी प्रकरणात एच. आर. विभागाचा उल्लेख वारंवार झाला. संबंधित पीडितेने वारंवार तक्रार करूनही तिची दखल घेतली गेली नाही. हे वास्तव अस्वस्थ करणारे आहे. यावरून एक मोठा प्रश्न उपस्थित होतो की, आज कॉर्पोरेट क्षेत्रात या पदावर काम करणाऱ्यांकडे प्रशासकीय कामाचा आणि मानवी संवेदनांचा नेमका किती अनुभव आहे? केवळ इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असणे किंवा पॉवरपॉईंट प्रेझेंटेशन सादर करणे म्हणजे प्रशासन चालवणे नव्हे. प्रशासन ही केवळ एक तांत्रिक प्रोसेस नाही, तर ती माणसे हाताळण्याची आणि त्यांना न्याय देण्याची एक नैतिक जबाबदारी आहे. अखेर प्रशासन म्हणजे केवळ फाईल्सचा ढिगारा किंवा नियमावलीचे कोरडे वाचन नव्हे, तर ती एक जिवंत आणि प्रतिसाद देणारी व्यवस्था असायला हवी. नाशिकसारख्या प्रकरणांनी हे सिद्ध केले आहे की, जेव्हा प्रशासकीय पदावर बसलेली व्यक्ती प्राप्त तक्रारींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते, तेव्हा केवळ संस्थाच नाही तर संपूर्ण समाज पोखरला जातो. आता वेळ आली आहे की, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी यातून बोध घ्यावा. केवळ पदव्यांच्या झगमगाटावर न थांबता, ज्यांच्याकडे समृद्ध प्रशासकीय अनुभव, नियमांचे अचूक ज्ञान आणि नैतिक जबाबदारीचे भान आहे, अशाच अनुभवी व्यक्तींना या पदांवर प्राधान्य द्यावे.

**अविनाश देशपांडे**/पुणे

## वाचक पत्रे

### अक्षय्य तृतीया

वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षाच्या तृतीयेला अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. सौभाग्य आणि शुभ परिणामांचा कधीही क्षय होत नाही ते अक्षय. या दिवशी केलेले कार्य मनुष्याच्या जीवनात कधीही न संपणारे शुभ फल देते म्हणूनच या दिवशी एखादे चांगले कर्म आणि दान याचे शुभ परिणाम मिळतात आणि त्याचा प्रभाव संपत नाही. हा दिवस भगवान विष्णू यांना समर्पित आहे. भगवान विष्णूने परशुरामाच्या रूपात पृथ्वीवर अवतार धारण केला म्हणून परशुराम यांचा वाढदिवस या दिवशी साजरा केला जातो. दुसऱ्या मान्यतेनुसार पृथ्वीची सर्वांत पवित्र मानली जाणारी गंगा नदी भगीरथी यांनी पृथ्वीवर आणली होती. हा दिवस माता अन्नपूर्णा देवी यांचा वाढदिवस देखील मानला जातो. या दिवशी अन्नपूर्णा देवीला मुरड कानोले याचा नैवेद्य दाखवून पूजा केली जाते. आपली माहेरी आलेली गौर परत सासरी चालली या भावनेने तिची पाठवणी करण्याचा हा दिवस. त्यामुळे गोडधोडाचा नैवेद्य दाखविला जातो.

साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्यामुळे नवीन वस्तू खरेदी, या दिवशी लग्न करणे शुभ मानले जातात. या व्यतिरिक्त उपनयन सोहळा, नवीन घरात प्रवेश, नवा व्यवसाय सुरू करणे, नवे प्रोजेक्ट हाती घेणे अशी शुभ कार्ये तसेच सोने, चांदी, गाडी यांची खरेदी मोठ्या प्रमाणावर केली जाते. या दिवशी पितरांची पूजा करून त्यांचे स्मरण केले जाते. ब्राह्मणाला सुरई, दही-पेढे, तूप-साखर, फळं, चिंच, वस्त्र यापैकी कशाचेही दान दिले जाते. घरी खीर, वडे, चिंचोणी, कुरडया, पापड, पन्हे आदी उन्हाळी पदार्थ करून देवाला नैवेद्य अर्पण केला जातो. अक्षय या शब्दाचा अर्थच अविनाशी म्हणजे कधीही न संपणारा. त्यामुळे हा दिवस पवित्र मानतात. नवीन खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते आणि आयुष्यात भरभराट करून देणारी अशी ही अक्षय्य तृतीया.

**स्नेहल खंडागळे**/नागपूर

### जरा शाळकरी मुलांचा विचार करा

राज्यात सर्वत्र उष्णतेची लाट आली आहे. विदर्भ तर तापला आहे. त्यासाठी सरकार सर्व स्तरातील लोकांसाठी उपाययोजना राबवणार आहे. मग भर उन्हात दुपारी १२, १ वाजता शाळेतून घरी येणारी लहान मुले त्यांना दिसत नाही का? मुलांची शाळेची वेळ कमी का केली जात नाही? कितीतरी लहान मुले उन्हाने आजारी पडतात. शाळा मे पर्यंत सुरू ठेवण्याची काहीच गरज नसते. पण फक्त शुल्क पूर्ण मिळावे म्हणून शाळेचा हा अट्टहास आहे. बिचाऱ्या कोवळ्या मुलांचाही जरा विचार व्हावा आणि शाळेला एप्रिल-मे च्या सुट्ट्या द्याव्या. जेणेकरून मुले आजारी पडणार नाहीत.

**अपर्णा अग्निहोत्री**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लोहीग्राममध्ये समाधान शिबिरातून ३८४ लाभार्थ्यांच्या स्वप्नांना मिळाली उभारी

## कृषी योजनेअंतर्गत रमाकांत काळे यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप, प्रशासनाच्या गतिमान कामाचे सर्वत्र कौतुक

**परभणी,/प्रतिनिधी** - - शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ थेट जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी लोहीग्राम येथे शुक्रवार दि.१० एप्रिल २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सोनपेठचे तहसीलदार सुनिल कावरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या विशेष मोहिमेअंतर्गत शेळगाव मंडळातील एकूण ३८४ लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यात आला.



लोहीग्राम येथील समाधान शिबिरामध्ये ग्रामस्थांना जागेवरच सेवा व प्रमाणपत्र मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव दिसून आले. समाधान शिबिरात लोहीग्राम सरपंच अस्मिता अनंतराव हिक्के, कान्हेगाव सरपंच माणिक कोरडे, नायब तहसीलदार देवेंद्रसिंह चंदेल, मंडळ अधिकारी ज्योती प्रधान, उप कृषी अधिकारी मोतीराम भंडारे, पशुसंवर्धन अधिकारी एस.एम.डाके, भूमी अभिलेख विभागाचे महेश काकडे, ग्राम महसूल अधिकारी अमोल स्वामी,बालाजी नागदे, बाबाराव हरकळ, संघप्पा देशमुख, शाहुराज दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी स्वतः लाभार्थ्यांशी संवाद साधला आणि पात्र नागरिकांना शिधापत्रिका, संजय गांधी निराधार योजना, सातबारा नोंदी, नमुना ८-अ, फेरफार नोंदी, डिजिटल सातबारा, प्रमाणपत्रे, कृषी, आरोग्य, भूमी अभिलेख विभागाच्या योजनांचे तात्काळ वाटप केले. प्रशासकीय कामात पारदर्शकता आणि वेग आणून सामान्य नागरिकांचे प्रश्न त्यांच्या दारी जाऊन सोडवणे हाच या शिबिराचा मुख्य उद्देश आहे, असे प्रतिपादन नायब तहसीलदार श्री.चंदेल यांनी यावेळी केले. ''अधिकारी स्वतः आमच्या गावात आले, यामुळे आमचा वेळ आणि पैसा वाचला,'' अशी कृतज्ञ भावना लाभार्थ्यांनी यावेळी व्यक्त केली. प्रशासनाच्या या गतिमान कामामुळे प्रलंबित कामे निकाली निघाल्याने शेळगाव महसूल मंडळ परिसरात समाधान व्यक्त होत आहे. एकूणच प्रशासन आपल्या दारी हा उद्देश या शिबिरामुळे यशस्वी ठरला आहे. यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना मिनी ट्रॅक्टरचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून आभार मंडळ अधिकारी पंकज पाटील यांनी मानले. या कार्यक्रमाला शेतकरी, विद्यार्थी, ग्रामस्थ आणि लाभार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### सेलू नगर परिषदेकडून उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिकांची घोषणा : डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त उपक्रम

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू नगर परिषद व पोलिस प्रशासनाच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सेलू शहरात काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीतील उत्कृष्ट देखाव्यांना पारितोषिके जाहीर करण्यात आली आहेत.

मंगळवार १४ एप्रिल रोजी होणाऱ्या मिरवणुकीत सहभागी होणाऱ्या उत्कृष्ट देखाव्यांना प्रथम पारितोषिक ११ हजार रुपये, सन्मानचिन्ह व पोलिस प्रशासनाचे प्रशस्तीपत्र, द्वितीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र, तसेच तृतीय पारितोषिक ५ हजार रुपये, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

सेलू शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुकीत विविध मंडळांकडून सादर करण्यात येणाऱ्या देखाव्यांचे परीक्षण समितीमार्फत मूल्यांकन करून विजेत्यांची निवड करण्यात येणार आहे, अशी माहिती नगराध्यक्ष मिलिंद सावंत, पोलिस उपअधीक्षक दीपक वाघमारे, पोलिस निरीक्षक दीपक बारसे यांनी दिली असून, मिरवणुकीत मोठ्या संख्येने सहभागी होऊन आकर्षक व वैचारिक देखावे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### सोनपेठेत महाआरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; १२५० रुग्णांची तपासणी : १४० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड : शिबिरात २० जणांचे रक्तदान

**सोनपेठ,/प्रतिनिधी :** येथील दीपस्तंभ प्रतिष्ठान व हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यमंत्री तथा परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना बोर्डीकर-साकोरे यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच कै. राजेभाऊ दादाराव कदम यांच्या जयंतीनिमित्त आयोजित भव्य महाआरोग्य शिबिराला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला. शुक्रवारी पार पडलेल्या या शिबिरात तालुक्यातील एकूण १२५० रुग्णांची मोफत तपासणी व उपचार करण्यात आले.

छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक सभागृह येथे आयोजित या शिबिराचे उद्घाटन नगराध्यक्ष परमेश्वर कदम यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रा. डॉ. मुंजाभाऊ धोंडगे, लक्ष्मण धोंडगे, जयप्रकाश बचाटे, मुख्याधिकारी रामप्रसाद यादव, गटनेते हाजी सद्दाम हुसेन, अजय देशमुख, नगरसेवक विश्वजीत कदम, रहेमान सौदागर, जनार्धन झिरपे, शुभम कदम, अक्षय कदम, संतोष अंबुरे, खदिर अंसारी, दत्ता पांढरे, लक्ष्मीकांत कांदे, मारोती रंजवे तसेच शहर परिवर्तन आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरात तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाद्वारे विविध आजारांवर रुग्णांना मार्गदर्शन व औषधोपचार करण्यात आले. यामध्ये नेत्र तपासणीसाठी ५९०, हाडांच्या तपासणीसाठी ३२०, दमा व श्वसनविकारांसाठी १५०, कान-नाक-घसा तपासणीसाठी १३० तर लहान मुलांच्या तपासणीसाठी ४० रुग्णांनी लाभ घेतला. याचबरोबर रक्तदान शिबिराचेही आयोजन करण्यात आले.

शिबिराचे वैशिष्ट्य म्हणजे तपासणीनंतर १४० रुग्णांची मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली असून, कॅन्सर, किडनी विकार, मणक्याचे आजार व इतर गंभीर आजार असलेल्या ४२ रुग्णांच्या पुढील उपचारांचे नियोजन करण्यात आले आहे. या सर्व शस्त्रक्रिया मोफत करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### बोरी व चारठाणाकरांचा अप्पर तहसील कार्यालय स्थापनेकरीता आग्रह : जिंतूर तालुक्यात अपर तहसील कार्यालय स्थापनेकरीता बैठक : लोकप्रतिनिधी व नागरिकांनी मांडली मते

**परभणी,/प्रतिनिधी :** जिंतूर तालुक्यातील बोरी व चारठाणा येथील ग्रामस्थांनी शुक्रवारी अप्पर तहसील कार्यालय स्थापने संदर्भात आयोजित केलेल्या बैठकीत आपआपल्या गावांचा आग्रह धरला.

परभणी जिल्ह्यात सुधारित आकृतीबंधात जिंतुर तालुक्यातील बोरी / चारठाणा अपर तहसील कार्यालय निर्माण करण्याच्या अनुषंगाने शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी, सेलूचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी, जिंतूर तहसिलदार शितल कच्छवे आदींसह जिंतुर तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच तथा प्रशासक ग्रामपंचायत कार्यालय, नागरिक उपस्थित होते.

जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी उपस्थित मान्यवर व नागरिकांचे अभिप्राय संयमाने ऐकून घेतले. त्यांनी नमूद केले की, प्रस्तावित निर्णय घेताना स्थानिक नागरिकांची सोय, आवश्यकता तसेच सर्व संबंधित घटकांच्या भावना यांचा विचार करण्यात येईल. तसेच बैठकीत मांडण्यात आलेल्या सर्व मागण्या शासनास सादर करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

प्रारंभी अपर तहसील कार्यालय कुठे स्थापन करावे, याबाबत उपस्थित नागरिक आणि लोकप्रतिनिधींनी आपापली मते मांडली. काहींनी बोरी येथे कार्यालय व्हावे, तर काहींनी चारठाणा येथे व्हावे, अशी मागणी केली. यामुळे या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

### परशुराम जन्मोत्सवानिमित्त १९ एप्रिलला परभणीत भव्य शोभायात्रेचे आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त रविवारी १९ एप्रिल रोजी शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती सार्वजनिक भगवान श्री परशुराम जन्मोत्सव समितीने दिली.

या शोभायात्रेस शनिवार बाजारातील श्री रेणूकामाता मंदिर येथून सायंकाळी ५ वाजता प्रारंभ होणार असून समारोप स्टेशन रस्त्यावरील श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथे होणार आहे. या शोभायात्रेत भगवान श्री परशुराम यांचा भव्य रथ आणि पालखी हे प्रमुख आकर्षण ठरणार आहे. तसेच गोमाता पूजन, गोवंश संवर्धन व संरक्षण या विषयांवर सजीव देखावे सादर केले जाणार आहेत. यासोबतच गोहत्या बंदी कायद्याबाबत जनजागृती, लाठी-काठी खेळांचे प्रात्यक्षिक, फेटाधारी महिला पथक, वैदिक गुरुकुलातील विद्यार्थ्यांकडून मंत्र व वेद पठण, पारंपरिक हलगी पथक आणि विविध सांस्कृतिक सादरीकरणांचा समावेश असणार आहे. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांसाठी आमरस-पुरीचा महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे.

दरम्यान, दरवर्षीप्रमाणे यंदाही हा उत्सव उत्साहात साजरा होत असून, या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या पावन उत्सवात कुटुंबीय व मित्रपरिवारासह सहभागी होऊन कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन सार्वजनिक भगवान श्री परशुराम जन्मोत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

## इयत्ता दहावी सी.बी.एस.इ निकालात बोर्डीकर्स पोदार लर्न स्कूल जिंतूर चा शंभर टक्के निकाल

**जिंतूर,/प्रतिनिधी-** इयत्ता दहावी सी.बी.एस.इ २०२५-२६ चा निकाल जाहिर झाला असून जिंतूर येथील बोर्डीकर्स स्कूल चा शंभर टक्के लागला आहे यामध्ये चौदा पैकी चौदा विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

यात आर्या रेघाटे ९८% , प्राची सांगळे९६% , सानविका राठोड ९५.२% , भक्ती कदम ९२.२%, पार्थ सडाळ ९०.२% या विद्यार्थ्यांनी नव्वद पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत. विशेष म्हणजे आर्या रेघाटे या विद्यार्थीनीने इंग्लिश या विषयात १०० पैकी १०० गुण घेतले आहेत.तसेच गुणानुक्रमे विद्यार्थी मोनाली राठोड ८७.८% , समर्थ बारवकर ८५.४%, अभिषेक राठोड ८२.६%, वेदांत तळेकर ८१%, भक्ती मोरे ८०.४%, पलक पोरवाल ७९.४% , रितेश मस्के ७५.८%, आयान सोरठीया ७१.२%, शिवराज बोराडे ६५.२%, असे विद्यार्थी उत्तीर्ण ठरले आहेत.

या यशाबद्दल शाळेच्या अध्यक्ष सौ.भावनाताई मुंगसे बोर्डीकर, प्रिन्सिपल रेणू मिश्रा, शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या कडून सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक हार्दिक हार्दिक अभिनंदन करण्यात आलेलेआहे.

## महाआरोग्य शिबीरास प्रतिसाद

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** महामानव भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडी सोनपेठ यांच्या वतीने डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जयंती साजरी करण्यात आली, यानिमित्त महा रक्तदान शिबिर व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते, पो. नि. अशोक गित्ते, स.पो.नि.विनोद चव्हाण, ग्रामीण रुग्णालयाचे अधिक्षक डॉ.व्हि.एस कराड , वैद्यकीय अधिकारी डॉ सिद्धेश्वर हालगे, बाळासाहेब बोकरे , प्रा डॉ विठ्ठल जायभाय ,आशिष मुंढे, कल्याण वाघमारे, सुधीर बिंदू ,पो.उ.नि.अजय किरकन, चंद्रशेखर किरवले, सुनिल प्रधान , वैभव खंदारे, साहेबराव किरवले, महाराष्ट्रातील प्रसिद्ध गायक आहे.

## भिमजयंतीच्या मिरवणूकीत जिंतूरात युवकावर चाकू हल्ला; जखमीस जिल्हा रुग्णालयात हलविले

**जिंतूर,/प्रतिनिधी :** भिमजयंती च्या मिरवणूकीत जिंतूरात युवकावर चाकू हल्ला; जखमीस जिल्हा रुग्णालयात हलविले आहे. शहरातील हुतात्मा स्मारक परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या मिरवणुकीदरम्यान एका युवकावर चाकूने हल्ला करण्यात आल्याची घटना मंगळवारी (दि.१४ एप्रील) रात्री सुमारे ८ वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मिरवणूक हुतात्मा स्मारक गार्डन परिसरात पोहोचली असताना काही युवकांमध्ये अज्ञात कारणावरून वाद झाला. या वादाचे रूपांतर शब्दिक चकमकीत झाले. त्याच दरम्यान एका अज्ञात युवकाने सुशिल बळीराम डोगरदेवे (वय ३६, रा. हुतात्मा स्मारक) यांच्यावर चाकूने हल्ला केला. या हल्ल्यात त्यांच्या उजव्या बरगडीवर तसेच दोन्ही मांडीवर वार करण्यात आले.

गंभीर जखमी अवस्थेत डोगरदेवे यांना तत्काळ जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे वैद्यकीय अधिकारी डॉ. परिहार, डॉ. गरड, डॉ. भुत्ते तसेच रुग्णालयातील कर्मचारी गंगाधर पालवे, सिस्टर राखोडे, सरकंडे, राठोड, रेश्मा शेख आदींनी प्राथमिक उपचार केले. पुढील उपचारासाठी त्यांना परभणी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक गजेंद्र सरोदे व त्यांच्या पथकाने घटनास्थळी व रुग्णालयात धाव घेतली. रुग्णालयात नागरिकांची मोठी गर्दी जमल्याने काही काळ तणाव निर्माण झाला होता. मात्र पोलिसांनी संयम राखत परिस्थिती नियंत्रणात आणली. उर्वरित मिरवणुका शांततेत पार पडल्या.या प्रकरणी बातमी देईपर्यंत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झालेली नाही.



**परभणी-जिंतूर- नारीशक्ती वंदना समर्थ नाथ भव्य रॅली परभणी जिल्ह्याच्या लोकप्रिय तथा कार्यसम्राट पालकमंत्री तथा राज्यमंत्री सौ मेघनादिदी साकोरे बोर्डीकर व सारिका राजेंद्र पारवे, जिल्हाध्यक्ष महिला मोर्चा परभणी ग्रामीण ग्रामीण यांच्या समर्थनात परभणीतील शनिवार बाजार तीन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरात पर्यंत भव्य दिव्य रॅलीचे आयोजन करण्यात आले होते या रॅलीमध्ये मनीषा जाधव जिल्हाध्यक्ष महानगर परभणी व जिल्ह्यातील ग्रामीण व शहरी भागातील महिला मोठ्या संख्येत उपस्थित होत्या**

## निबंध स्पर्धेत ज्ञानदा खपले विभागातप्रथम

**सेलू,/प्रतिनिधी-** सेलू येथील शिक्षण विभाग. पंचायत समितीच्या वतीने विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त शालेय,महाविद्यालयीन विद्यार्थी व खुल्या गटासाठी तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे बक्षीस वितरण मंगळवार १४ एप्रिल रोजी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयात झाले.

पाचवी ते दहावी या शालेय गटात प्रथम ज्ञानदा खपले (कन्या शाळा वालूर), व्दितीय सान्वी शितळे (नूतन विद्यालय सेलू) तृतिय ऋतुजा बोंबले (पी.एम. श्री डासाळा), या विद्यार्थिनींनी आणि खुल्या गटात उद्धव कंटाळे( जि.प्रा.शा बोरकिनी), कीर्ती राऊत (नूतन कन्या प्रशाला सेलू), आदिती आंबेकर (नूतन विद्यालय सेलू) यांनी अनुक्रमे प्रथम द्वितीय तितृय क्रमांक मिळवला तर महाविद्यालयीन गटात वैष्णवी गवारे नूतन महाविद्यालय उर्मिला मोगल या विद्यार्थिनीने उत्तेजनार्थ क्रमांक प्राप्त केला. विजेता स्पर्धकांचा गटविकास अधिकारी उदय जाधव, गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे यांनी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मान केला.

## ड्राय डे च्या दिवशी दारू विक्रेत्यांची चांदी बारच्या पाठीमागील दरवाजातून विक्री

**सेलू,/प्रतिनिधी-** तालूक्यात ड्राय डे च्या दिवशी राजरोसपणे दारूची विक्री होत असून मद्यप्रेमींना अव्वाच्यासव्वा दराने दारू खरेदी करावी लागत आहे.शहरात ड्राय डे केवळ नावालाच अशी काहीशी परिस्थीती आहे.अनेक बार,धाबे मागच्या दाराने मद्यप्रेमींना दारू देत असतात.शासनाने महापूरूषांच्या जयंत्या शांततेत साज-या व्हाव्यात हा हेतू असल्याने लाखो रूपयाचा महसूल बूडवून बिअर बार ,वाईन शाँप बंद करण्याचा निर्णय घेतला खरा मात्र या निर्णयाला हारताळ फासला जात आहे. तालूक्यातील काही ठराविक बार मालक राजकीय पदाचा दूरूपयोग घेवून पोलीस प्रशासनास हाताशी सर्रासपणे मद्य विक्री करत आहेत.शासन स्तरावरून राष्ट्रीय महापूरूषांच्या जयंती दिनी जयंत्या तसेच राष्ट्रीय सण साजरे करत असतांना शांततेत साजरे व्हावेत हा हेतू असल्याने या दिवशी वाईन शाँप व बिअर बार बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.दरम्यान शहरातील काही बार चालक मात्र बंदच्या दिवशी अव्वाच्यासव्वा दराने दारू विक्री करत आहेत.यामूळे अनेक कार्ययक्रमात भांडण तंटे होत असून या जबाबदार कोण हा प्रश्न पडला आहे.

पोलीस प्रशासनाची चूप्पी

ड्राय डेच्या दिवशी कूठल्या बार वर मद्य विक्री होत आहे हे सर्व संबधित बिट जमादारांना माहिती असतांना सूद्धा संबधित बार चालकावर कूठल्याही प्रकारची कारवाही करण्यात येत नाही. दरम्यान मद्य विकत घेणा-यावर पोलिस दमदाटी करत असतात.जर विक्री झालीच नाही तर खरेदीचा संबध काय हा प्रश्न निर्माण होतो. तालूक्यात देऊळगाव गात बिटामध्ये सर्वाधिक दारू विक्री होत आहे. गूगळी धामणगाव व सिमूर गव्हाण शिवार धाबा तर शिंदे टाकळी येथे सर्रासपणे दारू विक्री बिट जमादाराच्या आशिर्वादानेआहे.

## डॉ.के.पी.गारोळे इंटरनॅशनल स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी

**गंगाखेड ,/प्रतिनिधी:** येथील डॉ.के.पी.गारोळे इंटरनॅशनल स्कूलमध्ये भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती साजरी करण्यात आली.डॉ.के.पी.गारोळे यांचे मार्गदर्शन व सामाजिक बांधिलकीतून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामूहिक वाचन करून करण्यात आली.त्यानंतर महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेच्या संचालिका डॉ. किरण गारोळे होत्या.प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे प्राचार्य एम.एम.सुरनर,उपप्राचार्य




जगदीश मंदोडे उपस्थित होते.यावेळी प्राचार्य एम.एम. सुरनर यांनी बाबासाहेबांच्या जागतिक कीर्तीचा गौरवपूर्ण उल्लेख केला.त्यांनी सांगितले की,''अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून बाबासाहेबांनी अनेक उच्च पदव्या संपादन केल्या.आजही अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठ या नामांकित विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर त्यांच्या पुतळ्याला ज्ञानाचे प्रतीक म्हणून मानाचे स्थान देण्यात आले आहे.ही प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाची बाब असल्याचे म्हटले.

अध्यक्षीय समारोप करताना संचालिका डॉ.किरण गारोळे यांनी सांगितले की,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रम,त्याग आणि बुद्धिमत्तेच्या जोरावर भारताला जगातील सर्वोत्तम संविधान दिले.त्याच संविधानामुळे आज आपल्या देशाची एकता,अखंडता आणि लोकशाही टिकून आहे.शोषित,वंचित,महिला,विद्यार्थी,शेतकरी,जवान आणि समाजातील प्रत्येक घटकाला न्याय व समान संधी मिळवून देण्यात बाबासाहेबांचे योगदान अमूल्य आहे असे म्हटले.

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अक्षयतृतीयेला बालविवाह होणार नाहीत यांची खात्री करा- राहुल गुप्ता



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

येत्या अक्षय तृतीयेच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कुठेही बालविवाह होऊ नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहून नागरिकांनीही सक्रिय सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी केले. बालविवाहाची माहिती मिळाल्यास नागरिकांनी १०९८ या निशुल्क क्रमांकावर कळवावे, माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. बैठकीस महिला व बाल विकास अधिकारी संतोष दरपलवार यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

अक्षय तृतीयेसारख्या शुभ मुहूर्तावर बालविवाह होण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच विविध विभागांमध्ये समन्वय साधण्यासाठी ही बैठक घेण्यात आली. बालविवाह रोखण्याची जबाबदारी पोलीस पाटील, सरपंच, शिक्षक यांच्यासह फेटेवाले, हॉटेल चालक, मंगल कार्यालय संचालक, बँडवाले आणि विवाह विधी करणारे भटजी यांच्यावरही असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

मुलीचे वय १८ वर्षांपेक्षा कमी किंवा मुलाचे वय २१ वर्षांपेक्षा कमी असल्यास तो विवाह बालविवाह समजला जातो. बालविवाह प्रतिबंध अधिनियम २००६ मधील तरतुदीनुसार वयाची पडताळणी शाळेचे अभिलेख, परीक्षा मंडळाचे प्रमाणपत्र किंवा जन्मदाखल्यावरून करणे बंधनकारक आहे. वयाचा पुरावा उपलब्ध नसल्यास प्रकरण महिला व बालविकास समितीकडे पाठविणे आवश्यक आहे. विवाह समारंभात सेवा देणाऱ्या सर्व संबंधितांनी बालविवाह होणार नाही, याची खात्री करावी. अन्यथा संबंधितांचे परवाने रद्द करण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच कोणत्याही ठिकाणी बालविवाह झाल्याचे आढळल्यास संबंधित ग्रामपंचायतीस विकासकामांसाठी निधी रोखण्यात येईल, असा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांनी दिला.

शाळांमधील विद्यार्थिनी सलग १० दिवस अनुपस्थित असल्यास मुख्याध्यापकांनी त्वरित महिला व बालविकास विभागाला कळवावे. प्रत्येक विवाहाची नोंद घेणे आवश्यक असून नोंद न झाल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल. बालविवाह प्रतिबंध समितीमार्फत अचानक तपासण्या करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

टीसीवरील जन्मदिनांक व अधिकृत जन्मदाखला हाच ग्राह्य धरला जाईल. आधार कार्ड वयाच्या पुराव्यासाठी ग्राह्य राहणार नाही. धार्मिक स्थळांवरही बालविवाह होऊ नयेत, यासाठी धर्मगुरूंनी विशेष दक्षता घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. जिल्हा प्रशासनाकडून सर्व ग्रामपंचायतींना सूचना देण्यात येत असून परिपत्रके पाठवून जनजागृती करण्यात येत आहे. बसस्थानके, रेल्वे स्थानके व इतर सार्वजनिक ठिकाणीही जनजागृती मोहीम राबविण्यात येणार आहे. बालविवाहाची माहिती मिळताच नागरिकांनी तात्काळ १०९८ या हेल्पलाईनवर संपर्क साधावा, असे आवाहन प्रशासनाने केले आहे.

# नारीशक्ती वंदन बिला समर्थनार्थ भाजप महिला आघाडीची रॅली



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

हिंगोली येथे नारी शक्ती वंदन अधिनियमच्या समर्थनार्थ शहरातील मुख्य मार्गावरुन पदयात्रा काढण्यात आली. नारीशक्ती वंदन अधिनियमला समर्थन देण्यासाठी हिंगोलीतील स्थानिक नागरिक आणि महिला मोठ्या संख्येने रॅलीमध्ये सहभागी झाल्या.

छत्रपती शिवाजी महाराज पुतळा समोरुन पदयात्रेची सुरुवात करण्यात आली यावेळी महिला जिल्हाध्यक्ष उज्वलाताई तांभाळे, सौ. राजामतीताई मुटकुळे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, उपाध्यक्ष मिलींद यंबल, माजी शहराध्यक्षा कृष्णा रुहाटिया, माजी सभापती मंगलाताई कुटे, नंदाताई इंगळे, अश्विनी पाटील,मिरा सुर्यवंशी, निर्मला नादरे, अरुणा बिच्चेवार, ओबीसी महिला प्रदेश सचिव रजनी पाटील,सुनिता अरुणा भंगेवार, निलाताई ढोरे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, कार्याध्यक्ष पवन उपाध्याय, शिक्षक आघाडीचे जिल्हाध्यक्ष गजानन कुटे, संतोष टेकाळे, अमित रुहाटीया उपस्थित होते.

हिंगोलीत नारी शक्ती वंदन अधिनियम महिला आरक्षण विधेयकच्या समर्थनार्थ भव्य पदयात्रा आणि रॅली शहरातील मुख्य मार्गांवरून निघालेल्या या पदयात्रेत स्थानिक नागरिक, लोकप्रतिनिधी आणि महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा यांचे आभार महिलांनी मानले. महिलांना विधिमंडळात ३३ टक्के आरक्षण देणाऱ्या या विधेयकाबद्दल आनंद व्यक्त केला. या विधेयकामुळे महिलांना हक्क मिळणार आहे. यावेळी महिला सक्षमीकरणाचा संदेश देण्यात आला. पदयात्रेचा समारोप महात्मा गांधी चौक येथे करण्यात आले.

# भाजपच्या शहर कार्याध्यक्षपदी पवन उपाध्याय यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**



भारतीय जनता पक्षाच्या हिंगोली शहर कार्याध्यक्ष पदी पवन उपाध्याय यांची निवड करण्यात आली. राज्याच्या पक्ष सचिव तथा हिंगोली जिल्हा प्रभारी रेखाताई कुलकर्णी यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीचे पत्र प्रदान करण्यात आले.

पवन उपाध्याय यांनी आ.तान्हाजी मुटकुळे यांच्या नेतृत्वाखाली भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. यापूर्वी त्यांनी काँग्रेसमध्ये असताना शहराध्यक्ष म्हणून दीर्घकाळ काम पाहिले असून, त्यांच्या दांडग्या अनुभवाची आणि भाजपमधील सक्रियतेची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही नवीन जबाबदारी सोपविली आहे.जिल्हाध्यक्ष गजानन घुगे यांच्या स्वाक्षरीचे नियुक्ती पत्र रेखाताई कुलकर्णी यांनी पवन उपाध्याय यांना सुपूर्द केले. यावेळी पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

पवन उपाध्याय यांच्या या निवडीबद्दल खासदार रामराव वडकुते, आमदार तान्हाजीराव मुटकुळे, माजी आमदार प्रज्ञाताई सातव,जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर, सुभाषचंद्र लदनिया, माजी जिल्हा उपाध्यक्ष मिलिंद यंबल, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, विलास गोरे, संजय कावडे, रवी पाटील गोरेगावकर, बाबा घुगे, संजय ढोके, रजनीश पुरोहित, श्रीरंग राठोड, मनोज शर्मा, संजय खंडेलवाल, कैलास शहाणे, लखन कुरिल, अमित रुहाटिया, महेश शहाणे, राहुल मेने, प्रतिक अग्रवाल आदींनी त्यांचे अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.



**हिंगोली- जिल्ह्यात यावर्षी हळदीचे पीक चांगले झाले असून शेतकरी हळदीचे पीक काढीत आहे. दुसरीकडे उन्हाळ्याची चाहूल लागली असली तरीही शेतकरी कुटुंब आता शेतीच्या मशागतीसाठी भर उन्हात कामाला लागल्याचे चित्र दिसत आहे. छाया- सुनील पाठक**


## संक्षिप्त वृत्त

### एबीएम इंग्लीश स्कूलचा आर्यन सानप प्रथम



हिंगोली- शहरातील एबीएम इंग्लीश स्कूलच्या सीबीएससी दहावीचा निकाल लागला असून शाळेतून आर्यन सानप या विद्यार्थ्याने ९८.८०% गुण मिळवून जिल्ह्यात पहिला येण्याचा मान मिळवला. तसेच मराठी विषयात १००/१०० गुण मिळवले. तसेच १८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळवले हे उल्लेखनीय ठरते. संकल्प गुंडेवार यांनी ९५% गुण मिळवून संस्कृत भाषेत १००/१०० गुण मिळवले. २२ विद्यार्थ्यांनी ८५% पेक्षा जास्त गुण मिळवले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थाचालक दिलीप बांगर यांनी प्राचार्य तसेच शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### जिल्हाधिकाऱ्यांची डंपींग ग्राऊंडला भेट



हिंगोली- जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज कळमनुरी येथील डंपिंग ग्राऊंड (कचरा डेपो) तसेच नगर परिषदेच्या पाणीपुरवठा यंत्रणेची पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या. कळमनुरी येथील डंपिंग ग्राऊंडला भेट देऊन त्यांनी कचरा व्यवस्थापनाची सद्यस्थिती, स्वच्छता उपाययोजना, कचऱ्याचे वर्गीकरण व विल्हेवाट प्रक्रिया यांचा आढावा घेतला. परिसरात स्वच्छता राखण्यासाठी तसेच पर्यावरणपूरक पद्धतीने कचरा व्यवस्थापन करण्यासाठी उपाययोजना अधिक प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने कचरा डेपोची योग्य देखभाल करणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. त्यानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी कळमनुरी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेअंतर्गत पंपगृहाला भेट देऊन तेथील यंत्रणा, पाण्याचा पुरवठा, दाब व वितरण व्यवस्थेची पाहणी केली. नागरिकांना नियमित व शुद्ध पाणीपुरवठा मिळावा यासाठी यंत्रणा सक्षम ठेवण्याच्या तसेच उद्भवणाऱ्या अडचणी तात्काळ दूर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. यावेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी रविराज दरक तसेच संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# लेखी आश्वासनानंतर आरोग्य कर्मचाऱ्यांचे उपोषण सुटले



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

जिल्हा परिषदेतील आरोग्य विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी तसेच कार्यरत कर्मचारी यांच्या प्रलंबीत मागण्यांसाठी जिल्हा परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू करण्यात आले होते. या उपोषणाची दखल घेत जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलास शेळके उपोषणार्थींना त्यांच्या प्रलंबीत मागण्या लवकरात लवकर सोडविण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेने उपोषण तूर्त मागे घेतले असून मागण्या आठ दिवसांत पूर्ण न केल्यास तीव्र आंदोलनाचा इशाराही यावेळी संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. यावेळी प्रशासन अधिकारी विठ्ठल भुसारे तसेच संघटनेचे पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

# हिंगोलीत सूर्याचा प्रकोप, तापमानाचा पारा ४० अंशावर, रस्ते, कार्यालये निर्मनुष्य

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**



शहरात गेल्या काही दिवसांपासून उन्हाचा चटका प्रचंड वाढला असून उष्णतेचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. आज शहराचे तापमान अंदाजे ४० अंश सेल्सिअसच्या जवळ पोहोचल्याने दुपारच्या वेळी शहरात अक्षरशः शुकशुकाट पाहायला मिळत आहे. कडक उन्हामुळे नागरिक घराबाहेर पडण्याचे टाळत असल्याने शहरातील प्रमुख रस्ते ओस पडले आहेत.

नेहमी लोकांच्या गर्दीने गजबजलेले असणारे जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, नगरपालिका, जिल्हा व सत्र न्यायालय, पोलीस अधीक्षक कार्यालय आणि सार्वजनिक बांधकाम विभाग यांसारख्या महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांकडे जाणाऱ्या रस्त्यांवर आज दुपारी शुकशुकाट दिसून आला. शासकीय कामासाठी येणाऱ्या नागरिकांची संख्या घटली असून, या परिसरातील रस्ते आणि परिसर दुपारच्या सुमारास पूर्णपणे शांत झाले आहेत. वाढत्या उष्म्यामुळे डांबरी रस्ते तापत असल्याने वाहनधारकांनीही रस्त्यावरून फिरणे टाळले आहे.

वाढत्या उन्हाच्या पार्श्वभूमीवर तज्ज्ञ डॉक्टरांनी नागरिकांना आरोग्याची काळजी घेण्याचे आवाहन केले आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हाचा तडाखा सर्वाधिक असतो, त्यामुळे या काळात विनाकारण बाहेर फिरणे टाळावे, असे मत डॉक्टरांनी व्यक्त केले आहे. उष्माघातापासून वाचण्यासाठी जास्तीत जास्त पाणी पिणे, डोक्याला रुमाल बांधणे आणि सुती कपड्यांचा वापर करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.

एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाने आपला इंगा दाखवण्यास सुरुवात केली आहे. दुपारच्या वेळी रस्ते ओस पडत असल्याने व्यापारी पेठांवरही याचा परिणाम होत आहे. वाढत्या उष्णतेमुळे नागरिक आता पावसाची किंवा गारव्याची प्रतीक्षा करत आहेत.

# मुख्य रस्त्यावरील नाल्याचे ढापे तुटले, अपघातांची दाट शक्यता




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**

शहराच्या मध्यवर्ती भागातून जाणाऱ्या आणि अत्यंत गजबजलेल्या मुख्य रस्त्यावरील मोठ्या नाल्यावरील सिमेंटचे ढापे (स्लॅब) पूर्णपणे तुटले असून, सध्या या ठिकाणी अपघाताचा मोठा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, ज्या ठिकाणी हे ढापे तुटले आहेत, तिथे दोन नामांकित शाळा आणि दोन पोलीस ठाणी आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर समस्येकडे त्वरित लक्ष द्यावे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.

बस स्थानकासमोरील या मुख्य रस्त्यावर सरजूदेवी भिकूलाल भारुका विद्यालय आणि माणिक स्मारक विद्यालय या दोन मोठ्या शाळा आहेत. दररोज हजारो विद्यार्थी याच रस्त्यावरून ये-जा करतात. नाल्यावरील धापे निखळल्यामुळे आणि काही ठिकाणी मोठे खड्डे पडल्यामुळे सायकल किंवा पायी जाणाऱ्या विद्यार्थ्यांचा पाय अडकून गंभीर दुखापत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. याच रस्त्यावर शहर पोलीस स्टेशन आणि ग्रामीण पोलीस स्टेशनची कार्यालये आहेत. दिवसभर या भागात नागरिकांची आणि शासकीय वाहनांची मोठी वर्दळ असते. सार्वजनिक बांधकाम विभागाने या नाल्यावर संरक्षक ढापे टाकले होते, मात्र देखभालीअभावी हे धापे आता पूर्णपणे जीर्ण झाले आहेत. अनेक ठिकाणी तर हे ढापे तुटून नाल्यात पडले आहेत, ज्यामुळे रात्रीच्या वेळी एखादे वाहन यात कोसळण्याची भीती व्यक्त होत आहे.हा रस्ता शहराचा मुख्य कणा मानला जातो. असे असूनही सार्वजनिक बांधकाम विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. एखादा मोठा अपघात झाल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. बांधकाम विभागाने याकडे गांभीर्याने पाहून त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी नागरिक करीत आहेत.

# हिंगोलीतील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे काम युध्दपातळीवर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १६ एप्रिल**



जिल्ह्यातील आरोग्य सेवेला नवा आयाम देणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीचे बांधकाम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या विस्तीर्ण परिसरात सुरू असलेल्या या कामामुळे शहराच्या वैभवात भर पडणार असून, आरोग्य सुविधांच्या सक्षमीकरणाकडे हे एक मोठे पाऊल मानले जात आहे.

गेल्या काही दिवसांपासून या इमारतीच्या बांधकामाने गती घेतली आहे. अद्ययावत सोयी-सुविधांनी युक्त अशा या भव्य इमारतीचे स्वरूप आता स्पष्ट होऊ लागले आहे. कंत्राटदार आणि संबंधित विभागाकडून पावसाळ्यापूर्वी जास्तीत जास्त काम पूर्ण करण्याच्या उद्देशाने मजुरांची संख्या वाढवण्यात आली असून, यंत्रसामग्रीच्या साहाय्याने दिवस-रात्र काम सुरू आहे.

हिंगोलीत वैद्यकीय महाविद्यालय व्हावे, ही गेल्या अनेक वर्षांची मागणी होती. या महाविद्यालयामुळे स्थानिक विद्यार्थ्यांना जिल्ह्यातच उच्च वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळणार आहे. जिल्हा सामान्य रुग्णालयावरील ताण कमी होऊन अतिविशेषोपचार सुविधा उपलब्ध होतील. हिंगोलीसह शेजारच्या ग्रामीण भागातील रुग्णांना उपचारासाठी नांदेड किंवा छत्रपती संभाजीनगरला जाण्याची गरज भासणार नाही. सध्या सुरू असलेल्या कामाची गुणवत्ता आणि वेग पाहता, नियोजित वेळेत ही इमारत उभी राहील, असा विश्वास प्रशासनाकडून व्यक्त केला जात आहे.

# चार अल्पवयीन मुलांचा पाण्यात बुडून मृत्यू

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ एप्रिल -**

खड्ड्यात साचलेल्या पाण्यात पोहायला गेलेल्या चार अल्पवयीन मुलांचा बुडून मृत्यू झाल्याची घटना नांदेडमध्ये घडली. शहरातील देगलूर नाका परिसरातील इस्लामपूरा भागात गुरुवारी सकाळी साडेअकरा वाजता ही घटना घडली. मोहंमद अली मोहंमद इद्रीस (१३), सय्यद इरफान सय्यद फिरोज (१३), मोहंमद अदनान मोहंमद फिरोज (१०) आणि आयान इब्राहिम बागवान (११) अशी बुडालेल्या मुलांची नावे आहेत.

इस्लामपूरा भागातील मोकळ्या जागेत एका खड्ड्यात पाणी साचलेले होते. शाळेची सुट्टी झाल्यानंतर चार अल्पवयीन मुले या खड्यात पोहण्यासाठी गेली. मात्र पाण्याचा अंदाज न आल्याने त्यांचा बुडून मृत्यू झाला. दरम्यान याठिकाणी महापालिकेमार्फत खाजगी कंत्राटदाराच्या माध्यमातून नाल्याचे बांधकाम सुरु होते. संबंधित खड्डा नेमका कुणी व कसा खोदला? किती दिवसांपासून हे काम सुरु होते?, याची माहिती प्राप्त होऊ शकली नाही.



घटनेचे वृत्त समजताच पोलीस उपअधीक्षक प्रशांत शिंदे, इतवारा पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी व जीवरक्षक दल घटनास्थळी दाखल झाले. चौघांचे मृतदेह बाहेर काढत शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात नेण्यात आले आहे.

# किनवट तालुका उन्हाच्या झळांनी होरपळणार; पुढील ५ दिवस 'हाय अलर्ट'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १६ एप्रिल -**

तालुक्यासह संपूर्ण जिल्ह्यात उन्हाचा तडाखा आता तीव्र झाला असून पुढील ४ ते ५ दिवस नागरिकांसाठी अत्यंत कठीण जाणार आहेत. पुणे हवामान विभागाच्या अंदाजानुसार, विदर्भाच्या सीमेवर असलेल्या किनवट तालुक्यात तापमानाचा पारा ४० ते ४५ अंशांच्या पार जाण्याची शक्यता आहे. वाढत्या उष्णतेच्या लाटेचे संकेत लक्षात घेता प्रशासनाने नागरिकांना 'हाय अलर्ट' जारी केला असून विनाकारण घराबाहेर न पडण्याचे आवाहन केले आहे.



वाढत्या तापमानामुळे उष्माघाताचा धोका मोठ्या प्रमाणावर वाढला असून, राजगड प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. भाग्यश्री वाघमारे यांनी नागरिकांना आरोग्याबाबत विशेष खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे. डॉ. वाघमारे यांनी सांगितले की, वाढत्या तापमानामुळे शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन उष्माघाताचा धोका निर्माण होऊ शकतो. जर कोणाला अचानक चक्कर येणे, तीव्र डोकेदुखी, मळमळणे, प्रचंड थकवा जाणवणे, स्नायूंमध्ये गोळे येणे किंवा घाम येणे बंद होऊन त्वचा लाल व कोरडी पडणे अशी लक्षणे आढळल्यास, त्याकडे उष्माघाताची पूर्वलक्षणे म्हणून पहावे आणि त्वरित वैद्यकीय उपचार घ्यावेत. यापासून बचावासाठी नागरिकांनी तहान नसली तरीही दिवसातून किमान ३ ते ४ लिटर पाणी पिणे, आहारात ताक, लिंबू सरबत आणि शहाळ्याचे पाणी यांसारख्या नैसर्गिक पेयांचा समावेश करणे आवश्यक आहे. दुपारी १२ ते ४ या वेळेत उन्हाची तीव्रता सर्वाधिक असल्याने या काळात बाहेर पडणे टाळावे. बाहेर जाणे अनिवार्य असल्यास डोक्याला पांढरा रुमाल, टोपी किंवा छत्रीचा वापर करावा आणि सुती कपड्यांना प्राधान्य द्यावे. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गरोदर महिलांनी या उष्णतेच्या लाटेत स्वतःची विशेष काळजी घ्यावी.

किनवट परिसरातील वाढत्या उष्णतेमुळे शेतातील पिकांचे आणि पाळीव प्राण्यांचे संरक्षण करण्यासाठी सावली व पाण्याची पुरेशी व्यवस्था करावी, अशा सूचनाही तालुका प्रशासनाकडून देण्यात आल्या आहेत. वाढत्या उन्हामुळे नागरिकांनी घाबरून न जाता आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन आरोग्य प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

# नगरपंचायत कर निर्धारकाविरूध्द चौकशीचे आदेश

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १६ एप्रिल -**

हिमायतनगर नगरपंचायत मध्ये गेल्या अनेक दिवसांपासुन एकाच ठिकाणी कार्यरत असलेले कर निर्धारक चंद्रशेखर महाजन यांच्या चौकशीचे आदेश सामान्य प्रशासन विभागाने दिले असून त्यांची चौकशी निश्चीत असल्याचे बोलल्या जात आहे.

हिमायतनगर नगरपंचायतीचे नवनिर्वाचीत नगरसेवक तथा गटनेते सरदार खान यांनी दिनांक ९ एप्रिल रोजी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे तक्रार केली होती.सदर तक्रारी मध्ये लोकप्रतिधी यांना उर्मट शब्दात बोलणे अरेरवाची भाषा करणे,पदाचा दुरूपयोग करणे, लोकांना वेठीस धरणे,माहीती अधिकारा मध्ये माहीती मागीतली असता माहीती न देणे,लोकप्रतीनिधी यांना अपमानीत करणे,काम घेऊन आलेल्या नागरीकांना उडवा उडवीचे उत्तर देणे,४३नबर मागीतला असता तो न देणे,एखाद्या नागरीकांने त्यांची वरीष्ठा कडे तक्रार केल्यास तक्रार करणा-या नागरीकांस उध्दटपणे बोलणे या सर्व बाबीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागाने दिनांक १३ एप्रिल रोजी पत्राद्वारे चौकशीचे आदेश काढले आहे.




# जिल्हा मुख्याध्यापक संघाची गुरुवारी बैठक

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ एप्रिल -**

जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक मुख्याध्यापक संघाच्या कार्यकारिणीची महत्त्वपूर्ण बैठक गुरुवारी (ता. २३) आयोजित करण्यात आली आहे. जिल्हाध्यक्ष विठ्ठल चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या बैठकीत विविध प्रलंबित शैक्षणिक प्रश्नांवर चर्चा करून धोरणात्मक निर्णय घेतले जाणार आहेत.

स्थानिक आय.टी.आय. समोरील नांदेड जिल्हा शिक्षण मंडळाच्या कार्यालयात सकाळी १०:३० वाजता ही बैठक संपन्न होईल. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक संघाचे सचिव अशोक मोरे, मराठवाडा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष संजय शिप्परकर आणि राज्य संघाचे माजी सचिव मोतीभाऊ केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती व मार्गदर्शन लाभणार आहे.

या बैठकीत मुख्याध्यापकांच्या समस्या, शिक्षण क्षेत्रातील नवीन आव्हाने आणि संघटनात्मक बांधणी यावर सविस्तर खल होणार आहे. बैठकीस कार्यकारिणीच्या सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन सचिव मोहन फाजगे, कार्याध्यक्ष मारोती पाटील दुडले आणि प्रसिद्धी प्रमुख विजय होपळे यांनी केले आहे.



## मराठी पत्रकार संघटनेच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन

**मुदखेड** -मुदखेड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नियोजीत पुतळ्याच्या ठिकाणी दि.१४ एप्रिल रोजी भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार भारतरत्न परम पुज्य बोधीसत्व डॉ. बाबासाहेब भिमराव रामजी आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंती दिनानिमित्त तालुका मराठी पत्रकार परिषद व शहरातील विविध पक्षाचे पदाधिकारी, सामाजीक कार्यकर्ते, आणि बौद्ध अनुयायी यांच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यावेळी सर्वप्रथम भंत्ते गगनबोधी यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पंचशील ध्वज सपोनि बि.आर, कांबळे,व निळा ध्वज ध्वजारोहण प्रविण गायकवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यानंतर भंत्ते गगनबोधी यांनी सामुहीक त्रिशरण व पंचशील गाथेनंतर समता सैनिक दलाच्या वतीने मानवंदना देण्यात आली. यावेळी मराठी पत्रकार परिषदेचे माजी जिल्हा संघटक प्रतापराव देशमुख बारडकर, संतोष पाटील गाडे, तालुकाध्यक्ष सिद्धार्थ चौदंते, शहराध्यक्ष अतिक अहमद, कार्याध्यक्ष दिनेश शर्मा, साहेबराव हौसरे, शेख इरफान, संतोष सावंत, महमद हकिम, शेख जब्बार, यासह आदि पत्रकार बांधवांची उपस्थिती होती.

## निवळीत डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



**आदमपूर** -मुखेड तालुक्यातील ग्राम निवळी येथील ग्रामपंचायत कार्यालयात मंगळवार दि.१४ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त सामुहिक अभिवादन करण्यात आले.परिसरातील शाळा,महाविद्यालय व शासकीय इतर कार्यालयातही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. सर्वप्रथम डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करीत मान्यवरांकडून वंदन करण्यात आले.यावेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा जयघोष करण्यात आला.यावेळी निवळी ग्रामचे सरपंच शिवसांब अप्पा मठपती,उपसरपंच संभाजी पाटील माळेगावे, पोलीस पाटील, सामाजिक कार्यकर्ते, व्यावसायिक, व्यापारी, पत्रकार, शेतकरी सेवानिवृत्त कर्मचारीवर्ग, ग्राम पंचायत सदस्य, आजी, माजी पदाधिकारी, प्रतिष्ठित नागरिक,गावकरी व आंबेडकरवादी अनुयायी बांधव यांची उल्लेखनीय उपस्थिती होती.

# स्वच्छता ब्रॅन्ड अँबेसिडर सदगुरू साईनाथ महाराज यांच्या आश्रमातील माहुरगडावर अधिक मासानिमित्त महिनाभर अन्नदान

**तभा वृतसेवा**
**उमरी, दि. १६ एप्रिल -**

तालुक्यातील संताच्या भूमित जन्मलेले महाराष्ट्रात स्वच्छता ब्रँड अँबेसिडर सध्या प्रसिद्ध झालेले राट्रसंत सदगुरू साईनाथ महाराज बितनाळकर उर्फ वसमतकर यांच्या श्रीक्षेत्र माहुर गडावरील आश्रमात अधिक मास (धोंड्याचा महिना) पुरुषोत्तम मासानिमित्त १७ मे २०२६ ते १५ जून २०२६ या कालावधीत भव्य अन्नदान व दत्त नामस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. गोरठा येथिल संतदासगणू महाराज यांच्या गावी कांही काळ सदगरु साईनाथ महाराज यांचे वडिल वास्तव्यात होते याच पावन पवित्र भूमित तालुक्यातील बितनाळ येथिल संत म्हणून साईनाथ महाराज हे दुसरे संत म्हणून उदयास आले आहेत त्यांचा दत्तनामाचे नामस्मण अन्नदान जोड हे श्रीक्षेत्र माहुर गडात अग्रेसर आहे त्यांच्या विविध सामाजिक उपक्रमाची दखल घेवून शासनाने



महाराष्ट्राचे स्वच्छता दूत ब्रँड अँबेसिडर म्हणून निवड केली आहे शासकीय आयटीआय प्रमुख मार्गदर्शक, परमपूज्य साईनाथ महाराज वसमतकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा आध्यात्मिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रम पार पडणार आहे. श्री साईनाथ महाराज वसमतकर हे समाजप्रबोधन, स्वच्छता, अन्नदान व अध्यात्म क्षेत्रात सातत्याने कार्यरत असून, त्यांच्या दशसूत्री कार्यक्रमातून राज्यभर विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये नित्य अन्नदान, शिवनेरी किल्ल्यावर दत्त नामस्मरण, अटारी बॉर्डर येथे दत्त नामाचा गजर, तसेच गिरनार पर्वतावर सात दिवसांचा सप्ताह व नामस्मरण यांसारख्या उपक्रमांचा समावेश आहे. स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, बुवाबाजीविरोधी जनजागृती, शैक्षणिक व आध्यात्मिक क्षेत्रातही ते सातत्याने कार्यरत आहेत.

या उपक्रमासाठी माहूर तालुक्यातील भाविक, नागरिक व पत्रकार बांधवांना चुलबंद आमंत्रण देण्यात आले आहे. या पवित्र सोहळ्याची सुरुवात १७ मे रोजी भव्य अन्नदानाच्या पहिल्या पंगतीने होणार असून, ही सेवा उमरी तालुक्यातील संयमी विद्यवान सुभाष देशमुख गोरठेकर ( नाना ) उमरी सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर, उमरी उपनराध्यक्ष कैलासभाऊ देशमुख गोरठेकर, व समस्त गोरठेकर परिवार आणि गावकरी मंडळी यांच्या वतीने करण्यात येणार आहे. अखंड अन्नदान महायज्ञाचा समारोप १५ जून रोजी श्री साईनाथ महाराज वसमतकर यांचे जन्मगाव बितनाळ येथील भाविकांच्या वतीने करण्यात येणार आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १६ एप्रिल -**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीचे औचित्य साधून बहुजन संघर्ष सेनेच्या वतीने नांदेड शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. रेल्वे स्टेशन परिसरातील महामानवाच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन, पुस्तक वाटप आणि कार्यक्रमाची सुरुवात रेल्वे स्टेशन परिसरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी केवळ औपचारिक अभिवादन न थांबता, 'वाचाल तर वाचाल' हा संदेश कृतीत आणण्यासाठी बाबासाहेबांच्या जीवन चरित्रावरील पुस्तकांचे वाटप करण्यात आले.

# हिमायतनगरात भिमजंयती उत्साहात साजरी

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १६ एप्रिल -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती आज दि १४ एप्रिल रोजी शहरातील सार्वजनिक भीम जयंती महोत्सव समिती कडून मोठ्या उत्साहात, आनंदात साजरी करण्यात आली.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून आज दि १४ एप्रिल रोजी सार्वजनिक भीम जयंती महोत्सव समितीच्या वतीने आज सकाळी ११ वाजता हिमायतनगर शहरातील नालंदा बुद्ध विहार येथे पंचशील ध्वजाचे पूजन करुंन महा मानवांच्या जीवनावर प्रकाश टाकत आजच्या तरुण पिढीने डॉक्टर बाबासाहेबांचे विचार प्रत्येकाने आपल्या मनात रुजविण्यासाठी पुस्तके वाचून महामानवांना अभिवादन करावे असे सांगण्यात आले. यावेळी आलेल्या प्रमुख मान्यवरांचे भीम जयंती महोत्सव समितीकडून भारतीय संविधानाची प्रत देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी सार्वजनिक भीम जयंती महोत्सव समितीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भोकरमध्ये डीजे मुक्त वातावरणात डॉ.आंब्रेडकर जयंती साजरी

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि. १६ एप्रिल -**

भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती भोकर शहरात मोठ्या जल्लोशात डीजे मुक्त वातावरणात साजरी करण्यात आली.दि.१४एप्रील रोजी सकाळी ८-३०वाजता सर्व वार्डातील बुध्द विहारा समोर पंचशील ध्वजा रोहन करून त्रिशरण घेण्यात आले. लुंबिनी बुध्द विहार येथे जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते एल.ए.हिरे यांचे हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.त्यानंतर १०वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील नियोजित पुतळ्याच्या जागी सार्वजनिक जयंती मंडळाच्या अध्यक्षा सुलोचना ढोले यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सुरेश जोंधळे, सचिव उत्तम एडके यांनी सामुहिक त्रिशरण पंचशील घेतले. अनेकांनी बाबासाहेबांना पुष्पा माला वाहून अभिवादन केले. यावेळी माजी सभापती गोविंद बाबा गौड म्हणाले आता पुतळ्याच्या जागेवरील अतिक्रमण हाटले आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा झाला पाहिजे आपण वाटेल ती मदत करू असे आश्वासन दिले. तर नगराध्यक्ष भगवानराव दंडवे यांनी खा.अशोकराव चव्हाण यांच्या माध्यमातून या



जागेवर लवकरच सुशोभीकरण करणार असल्याचे सांगून तसा प्रस्ताव नगरपालिकेने शासनाला पाठविल्याचे सांगितले.भाजपचे कार्यकर्ते प्रशांत पोपशेटवार म्हणाले डॉ.आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष हिरे दाजी आहेत त्यांनी पुढाकार घ्यावा निधी कमी पडणार नाही म्हणाले. यावेळी एल.ए.हिरे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीची नोंदणी झाली असून आम्ही लवकरच कामाला लागू त्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी तहसीलदार विनोद गुंडमवार, उपनगराध्यक्ष दिलीप सोनवडे, नगरसेवक राजेश देशमुख, साई जटालवार,डॉ. बालाजी अंदबोरीकर, सिद्धू पिटलेवाड,दिनेश लक्षटवार,योगेश देशपांडे,अविनाश वाघमारे,डॉ. राम नाईक, डॉ. साईनाथ वाघमारे, नागोराव शेडगे, गौतम कसबे,पत्रकार बी. आर. पांचाळ,बी.एस. सरोदे,राजेश वाघमारे,अनिल डोईफोडे,शाहिर बाबुराव गाडेकर,साहेबराव मोरे,विकास क्षीरसागर,वैजनाथ क्षीरसागर, अनिल मुनेश्वर आदिसह मान्यवर उपस्थित होते

यावर्षी प्रथमच दि .१४ एप्रिल रोजी सायंकाळी ५वाजता बँड बाजासह भव्य मिरवणुक काढण्यात आली. यामध्ये सर्व जाती धर्माचे लोक सहभागी झाले होते. प्रथमच १४ एप्रिल लाच मिरवणूक काढल्याने जयंती मंडळाचे सर्वत्र कौतुक होत आहे.मिरवणुकीमध्ये तालुक्यातील व शहरातील महिला पुरुष मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. मिरवणुकीदरम्यान पो. नि.अजित कुंभार यांनी पोलिस बंदोबस्त चोख लावला होता. जयंतीच्या यशस्वीतेसाठी दिलीप राव,डॉ.मनोज गिमेकर,भीमराव दुधारे, सिद्धार्थ जाधव, दत्ता डोंगरे, मुकूंद धोतरे, अमोल ढोले, सम्राट हिरे सुनिल दुधारे आदिनी परिश्रम घेतले.

# इस्लापूरमध्ये जल जीवन मिशन कोलमडले

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १६ एप्रिल -**

गावकऱ्यांनी वारंवार तक्रारी, सूचना आणि निवेदने देऊनही ग्रामपंचायतीने दुर्लक्ष केल्याने जल जीवन मिशन इस्लापूरमध्ये पूर्णपणे अपयशी ठरल्याचे उघड झाले आहे. कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असले, तरी प्रत्यक्षात गाव आजही पाण्याविना वंचित आहे.

**सूचना दिल्या पण कृती शून्य!**

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार अनेक वेळा लेखी तक्रारी देण्यात आल्या ग्रामसभेत प्रश्न उपस्थित करण्यात आले संबंधित अधिकाऱ्यांना वारंवार कळविण्यात आले तरीही ग्रामपंचायतीने कोणतीही ठोस कारवाई केली नाही, असा थेट आरोप होत आहे.

**निष्काळजीपणामुळे योजना कोलमडली**

गावात अर्धवट पाइपलाईन, निष्क्रिय पाणीटाकी आणि कोरडे नळ ही परिस्थिती केवळ ठेकेदाराची नाही, तर ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणाची देणगी असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. कामांवर देखरेख नाही, तपासणी नाही आणि तक्रारींकडे पूर्ण दुर्लक्ष यामुळे योजना केवळ कागदावरच पूर्ण दाखवण्यात आली.

**पाण्यासाठी गावकऱ्यांची धडपड कायम**

उन्हाच्या तीव्रतेत महिलांना हंडे घेऊन दूरवर फिरावे लागत आहे. काही भागात टँकरवर अवलंबून राहण्याची वेळ आली आहे. निधी आहे, योजना आहे पण पाणी नाही! वास्तव भयावह

**रोखठोक सवाल**

ग्रामपंचायत वारंवार सूचना मिळूनही गप्प का बसली?, तक्रारींवर कोणतीही कारवाई का झाली नाही?, दोषींवर जबाबदारी निश्चित कधी होणार?, ग्रामस्थांनी प्रशासनाकडे ठाम मागणी केली आहे.

# तामसा - हदगाव राज्य महामार्गावर मृत्यूचे तांडव

**तभा वृतसेवा**
**तामसा, दि. १६ एप्रिल -**

तामसा ते हदगाव या राज्यमहामार्ग (क्र. २५१) वरील वाढत्या अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे हा रस्ता आता 'डेथ ट्रॅप' बनला असून, येथे तातडीने दुभाजक (डिवायडर), सर्व्हिस रोड आणि गतिरोधक बसवण्यात यावेत, अशी आक्रमक मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे. याबाबतचे सविस्तर या निवेदन केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी, जिल्हाधिकारी नांदेड, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण नांदेड यांना देण्यात आले आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, तामसा ते हदगाव या राज्य महामार्गावर रहदारीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. मात्र, संबंधित विभागाने नागरी वस्तीतून जाणाऱ्या या रस्त्यावर डीवायडर सोडाच साधे गतिरोधक किंवा झेब्रा क्रॉसिंग केले नसल्यामुळे वाहनचालक वेगावर नियंत्रण न ठेवता बेधुंद व भरधाव वेगाने गाड्या चालवत आहेत. गेल्या वर्षभरात झालेल्या अपघातात अनेक निष्पाप लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. यामध्ये एका तरुण व्यापाऱ्याचा, बाहेरगावी जाणाऱ्या एका महिलेचा, सकाळी मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या एका तरुणाचा आणि नुकताच संतोष राऊलवार या शिवणकाम करणाऱ्या कारागिराचा भीषण अपघातात मृत्यू झाला आहे. दिवसेंदिवस बळींची संख्या वाढत चालली असली तरी पोलीस आणि संबंधित प्रशासन बेफिकीरपणे वावरत असल्याने भयभीत नागरिकांतून संतापाची लाट उसळली असून शहरी भागातून जाणाऱ्या तामसा ते हदगाव रस्त्यावर तातडीने डीवायडर ( दुभाजक) सर्व्हिस रोडची उभारणी करुन शाळा, चौक आणि वर्दळीच्या ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने गतिरोधक (स्पीड ब्रेकर) बसवावेत. त्याचबरोबर अपघातप्रवण क्षेत्रात साईनबोर्ड, झेब्रा क्रॉसिंग आणि स्पीड लिमिट दर्शवणारे फलक लावण्यात यावेत. संबंधित विभागाने या कामात चालढकल केली आणि लवकरात लवकर उपाययोजना केल्या नाहीत, तर तामसेकरांना लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडावे लागेल. त्यानंतर उद्भवणाऱ्या कोणत्याही परिस्थितीला प्रशासनच जबाबदार असेल, असा कडक इशारा भाजपच्या महीला मोर्चाच्या तालुकाध्यक्षा ममता अर्जुन जोशी यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर अनेक मान्यवरांच्या आणि संतप्त नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

**किती निष्पापांचे बळी जाण्याची वाट पाहणार?**

संतप्त नागरिकांच्या आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर तरी प्रशासन त्या 'रक्तलांछित' रस्त्याकडे लक्ष देऊन तातडीने कारवाई करणार? की अजून किती निष्पापांचे बळी जाण्याची वाट पाहणार? असा सवाल सामान्य नागरिकांतून विचारला जात आहे.

## नगरसेविका सुलोचना काकडे यांची नागरी सुविधांची महापालिकाकडे मागणी

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १६ एप्रिल -**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ (वसरणी-कौठा) परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत नगरसेविका सुलोचना धोंडीबाराव काकडे यांनी महापौर व आयुक्त यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने सुविधा पुरवठा करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



नवीन नांदेड परिसरातील प्रभाग क्रमांक १९ मधील जुना कौठा पोलीस चौकी ते रविनगर या रस्त्याला सन १९९७ मध्ये महानगरपालिका महासभेने मंजुरी दिल्यानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग असे नामकरण करण्यात आले होते. रस्त्याच्या रुंदीकरणाच्या कामादरम्यान सदर नामफलक काढण्यात आल्याने तो ३१ मे रोजी होणाऱ्या अहिल्यादेवी होळकर जयंतीपूर्वी पूर्ववत बसविण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. जुना कौठा नवीन कौठा मित्र नगर साईबाबा मंदिर परिसर

तसेच प्रभागातील सिडको, संभाजी चौक, भिमवाडी, असर्जन, धुमाळवाडी, जयप्रकाशनगर, वसरणी आदी भागांमध्ये अनेक वर्षांपूर्वी बसविण्यात आलेले पथदिवे बंद पडले असून नागरिकांना अंधाराचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे संबंधित भागांमध्ये सुमारे २०० नवीन एलईडी पथदिवे उपलब्ध करून तातडीने बसविण्याची मागणी मनपाचे आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्याकडे करण्यात आली आहे.प्रभागातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांचा प्रश्न लक्षात घेऊन महानगरपालिकेने तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, अशी अपेक्षा सुलोचना काकडे यांनी निवेदनाद्वारे व्यक्त केली आहे.

